cmyk

## संपादकीय

### उप राष्ट्रपतींचा ठावठिकाणा नसणे गंभीरच...!

देशात सध्या सगळीकडेच काही ना काही आक्रित घडताना दिसत आहे. निवडणुकीतील मतदानाचे नवनवीन घोळ रोजच उघड केले जात असून फटाक्यांची माळ लागावी तशी प्रकरणे समोर येत आहेत. हे सगळे एकीकडे घडत असतानाच दुसरीकडे आणखीनच एक गंभीर मुद्दा विरोधी पक्षांच्या काही नेत्यांनी उपस्थित केला आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–११० | गुरूवार, दि.१४ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## अंगणवाडी सेविकांचे थाळीनाद आंदोलन

बीड : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करण्यात यावी यासह इतर मागण्यांसाठी आज जिल्हाभरातील अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी जि.प. कार्यालयावर थाळीनाद आंदोलन केले. या आंदोलनामुळे जिल्हा परिषदेचा परिसर दणाणून गेला होता. अंगणवाडी सेविकांना पेन्शन लागू करण्यात यावी, अंगणवाडी वकांचे पद रिक्त झाल्यानंतर त्या जागेवर शैक्षणिक पात्रतेनुसार मदतनीसची थेट नियुक्ती करण्यात यावी, कर्मचाऱ्यांचा प्रलंबित भत्ता देण्यात यावा यासह इतर मागण्यांसाठी आज जि.प. कार्यालयावर अंगणवाडी सेविकांनी थाळीनाद आंदोलन केले. या आंदोलनामध्ये कर्मचाऱ्यांचा मोठा सहभागा होता. आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हापरिषद अधिकाऱ्यांना देण्यात आले.

## थोडक्यात...

### राहुल गांधींचा दावा मागे

पुणे : राहुल गांधींच्या जीवाला धोका असल्याचा दावा आता मागे घेण्यात येणार आहे. काँग्रेस पक्षाकडून ॲड. मिलिंद पवार यांना हा दावा मागे घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ॲड. मिलिंद पवार यांनी राहुल गांधी यांच्याशी चर्चा न करता परस्पर पुणे न्यायालयात हा दावा केला होता. तो आता मागे घेण्यात येणार आहे.

### ऐन सणासुदीत साखरेचे दर कडाडले

मुंबई– ऐन सणासुदीत साखर महाग झाली असून साखरेच्या दरात प्रतिकिलो ५ ते ६ रुपयांची वाढ झाली आहे. उत्पादन खर्च वाढल्याने कारखानादारांकडून दरात वाढ केल्याने घाऊकसह किरकोळ बाजारात साखरेचे दर कडाडले आहेत. केंद्र सरकारने साखरेचा मासिक कोटा कमी केल्याने जनतेला दरवाढीची झळ सोसावी लागणार आहे.

### स्टेट बँक ऑफ इंडियाने नियम बदलला

नवी दिल्ली : भारतीय स्टेट बँकेने आयएमपीएसद्वारे केल्या जाणाऱ्या आर्थिक व्यवहारांसाठीच्या शुल्कात बदल केले आहेत. नव्या बदलांची अंमलबजावणी १५ ऑगस्ट २०२५ पासून करण्यात येणार आहे. या बदलाचा परिणाम ऑनलाइन आणि शाखेतून होणाऱ्या व्यवहारांवर परिणाम होणार आहे. मात्र, छोट्या रकमेचे व्यवहार अजूनही मोफत असतील. मोठ्या रकमेच्या ऑनलाइन व्यवहारांवर नाममात्र शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. शाखांमधून होणाऱ्या व्यवहारांबाबत आयएमपीएस शुल्कांबाबत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# परराज्यातून येणाऱ्या दुग्धजन्य पदार्थांची होणार तपासणी

## अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**भेसळयुक्त दुधामुळे नागरीकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून परराज्यातून येणाऱ्या दुग्धजन्य पदार्थांची तपासणी केली जाणार असल्याची घोषणा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केली. तसेच त्यांनी अचानकपणे एका दुकानात जाऊन अशा दुग्धजन्य पदार्थांची पहाणी सुध्दा केली आहे. त्यामुळे दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.**

राज्यात सध्या मोठ्या प्रमाणात भेसळीचे दुध असून बीड जिल्ह्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात सुध्दा भेसळीचे दुध अनेक वेळा पकडलेले आहे. भेसळीचे दुध प्रशासनाने अनेकवेळा रस्त्यावर टाकले होते. ▶▶ पान २ वर





### बीड जिल्ह्यातील भेसळ कोण थांबवणार?

बीड जिल्ह्यात दुध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ असल्याचे म्हटले जात असून आष्टी, पाटोदा आणि शिरुर तालुक्यात याचे केंद्र असल्याची चर्चा आहे. शिवाय भेसळ करणाऱ्यांना नेत्यांचा आशिर्वाद असल्याचे म्हटले जात असून दुध आणि दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ कोण थांबवणार ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# बॅनरवर गुन्हेगारांचा फोटो झळकल्यास गुन्हा दाखल होणार

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आदेश; होर्डिंगबाबतही निर्णय

**बीड । प्रतिनिधी**


**सार्वजनिक ठिकाणी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचे होर्डिंगवर फोटो लावल्यास कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. जर राजकीय नेत्यांच्या बॅनरवर गुन्हेगारांचे फोटो झळकल्यास गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. तसेच अनाधिकृत फलकावर कारवाई करण्याचे आदेश असून पालकमंत्री अजित पवार यांच्या दौऱ्यापुर्वी जिल्हाधिकाऱ्यांची आक्रमक भुमिका घेतली असल्याचे दिसत आहे.**

मागील काही दिवसांपूर्वी बीडमध्ये सरपंच देशमुख हत्या प्रकरण आणि सरपंच बापू आंधळे खून प्रकरणातील आरोपींचे फोटो मुख्य चौकातील बॅनरवर झळकले होते. तर पालकमंत्री अजित पवार यांच्या दौऱ्यादरम्यान अनधिकृत बॅनरचा विळखा देखील पाहायला मिळाला होता. अजित दादांनी अधिकाऱ्यांची कान उघडणी केली होती. याची गंभीर दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी यापुढे सार्वजनिक ठिकाणी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचे होर्डिंगवर फोटो लावल्यास कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अजित दादांच्या १५ ऑगस्टच्या दौऱ्यापूर्वी आदेश काढून कोणत्याही सार्वजनिक फलकावरील मजकूर ▶▶ पान २ वर



### नेमका काय आहे आदेश?

सामाजिक सलोखा व कायदा सुव्यवस्थेची काळजी, फलक बॅनर्स लावण्यापूर्वी मजकुराची पडताळणी आवश्यक, अनधिकृत फलकांवर तात्काळ कारवाई केली जाणार, सार्वजनिक ठिकाणी अडथळा निर्माण होणारे फलक बॅनर्स नसू नये अन्यथा यावर कार्यवाही होणार, बॅनर लावताना जातीय व धार्मिक भावना लक्षात घेणे आवश्यक आहे, असा आदेश जिल्हाधिकाऱ्यांचा आहे.



# जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दोन कोटीचे अनुदान

**बीड । प्रतिनिधी**

**मागील वर्षी गायीच्या दुधाचे भाव पडले होते, २० रूपये पर्यंत दुधाला भाव होता. त्यामुळे दुध उत्पादक शेतकरी अडचणीत आले होते. राज्य सरकारने दुधाला प्रति लि. ५ रूपयांचे अनुदान जाहिर केले होते.**

हे अनुदान राज्य सरकारने दिले असून बीड जिल्ह्यासाठी २१ कोटी रूपये आले आहेत. हे पैसे शेतकऱ्याच्या खात्यावर वर्ग झाले आहेत. मागील वर्षी गायीच्या दुधाचे भाव पडले होते. २० रूपया पर्यंत गायीच्या दुधाला भाव होता. ▶▶ पान २ वर

# रेल्वे सुरू होण्यापूर्वीच इमारतीला गळती

## चुकीचे पुल, निकृष्ट बांधकाम, रेल्वेला कोट्यावधीचा भुर्दंड

**बीड । प्रतिनिधी**

अहिल्यानगर बीड परळी रेल्वे मार्गावरील सराटा येथील चुकीच्या पद्धतीने बांधण्यात आलेला पूल रेल्वेने पाडला हे मोठे नुकसान असताना आता रेल्वे सुरू होण्यापूर्वीच रायमोहा येथील रेल्वे स्थानकाच्या निकृष्ट बांधकामामुळे येथील इमारतीला गळती लागली असून इमारतीचे पोपडेही निघाले आहेत यामुळे रेल्वे बोर्डाला कोट्यावतीचे नुकसान सहन करावी लागत आहे.




अहिल्यानगर बीड परळी या २५३ किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गाचे काम आता पूर्णत्वास आले आहे प्रामुख्याने रेल्वे बोर्डाचे अभियंता आणि निरीक्षक ▶▶ पान २ वर

# चकलांब्यात वाळू तस्करांना पुन्हा दणका

## ३०, लाखांचा मुद्देमाल जप्त

**चकलांबा । प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईच्या दिलेल्या आदेशानुसार चकलांब्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी पुन्हा वाळू तस्करांवर कारवाई केली आहे.गोदापात्रात केलेल्या या कारवाईत ३० लाख १८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी चकलांबा–पोलीस ठाण्यात १) बाळू पवार रा. गुळज व एक अज्ञात अश्या ०२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी मागच्या काही दिवसांत ▶▶ पान २ वर

# मस्साजोगच्या सरपंचांना दिल्लीतील ध्वजारोहणाचे निमंत्रण

**बीड– केज । प्रतिनिधी**

**स्वातंत्र्य दिनानिमित्त दिल्ली येथे होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्यास उपस्थितीत राहण्यासाठी केज तालुक्यातील मस्साजोग येथील महिला सरपंच वर्षा सोनवणे व त्यांचे यजमान आनंदराव सोनवणे या दोघांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निमंत्रित केले आहे.**

बीडचे जिल्हाधिका–यांनी हे निमंत्रण खास दुताकरवी सोनवणे यांच्याकडे सुपूर्द केला असून महाराष्ट्रातील त्या एकमेव सरपंच ठरल्या आहेत. याप्रकारे मस्साजोग येथील सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांनी त्यांच्या कारकिर्दीत केलेल्या पाणीदार शिवाराची दखल राष्ट्रीय पातळीवर होत असल्याने ग्रामस्थांनी जोरदार स्वागत केले आहे.मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांनी त्यांच्या कारकिर्दीत नाम फाउंडेशन व पाणी फाउंडेशन यांच्या वतीने दि. ५ मे २०२४ पासून मस्साजोग परिसरातील नदी खोली करण, तलावातील गाळ उपसा करुन तलावाचे ही खोलीकरण केले होते. ▶▶ पान २ वर



# उपअभियत्यांस डावलून सहाय्यकाकडे कार्यकारी अभियत्यांचा पदभार




**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात प्रशासनात अधिकाऱ्यांची वाणवा निर्माण झाली आहे. बीड जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता, जिल्हा ग्रामीण पाणी पुरवठा विभागासाठी शाखा अभियंत्याकडे कार्यकारी अभियंत्याचा पदभार देऊन नियम पायदळी तुडविले आहेत, अशी तक्रार करण्यात आली आहे .**

बीड जिल्हा परिषदेत बहुतांश अधिकारी व कर्मचारी अतिरिक्त कार्यभार सांभाळत असल्याने सगळाच अंदाधुंद कारभार सुरू आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. सदर पद आल्यानंतर बीड जिल्ह्यातील प्रशासन स्वतः सारखे सरळ होईल, अशी अपेक्षा होती . अजित दादांनी देखील पहिल्याच बैठकीत प्रामाणिकपणे काम करा. विकास कामांना खोडा घालू नका. संचिकांची पेंडन्सी ठेवू नका. वेळेवर कामे करा, अशा सूचना दिल्या होत्या. बीड जिल्ह्यातील मात्र महसूल, जिल्हा परिषद आदी बहुतांशी विभागात आदेश धाब्यावर बसविले आहेत. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचा पदभार हा निदान उप अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्याकडे सोपवणे गरजेचे असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मात्र परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झालेल्या ओ.बी. बिडकर या शाखा अभियंत्याकडे कार्यकारी दिला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या जल जीवन मिशनचा ▶▶ पान २ वर

# बीडचे नवे बसस्थानक प्रवाशांसाठी खुले

## ८० टक्के काम पुर्ण; एका बाजूने बससेवा सुरु

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या काही महिन्यापासून बीडच्या नविन बसस्थानकाचे काम सुरु असल्याचे पर्यायी बसस्थानकातून प्रवाशांसाठी बसेस सेवा देण्यात येत होती. सध्या या नव्या बसस्थानकाचे ८० टक्के काम पुर्ण झाले असून पावसाळा आणि प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता एका बाजूने हे बसस्थानक प्रवाशांसाठी खुले केले आहे.**

गेल्या पाच वर्षापुर्वी बीडच्या नव्या बसस्थानकाचे तत्कालीन परिवहनमंत्री दिवाकर रावते यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले होते.



शेवटी प्रदिर्घ काळानंतर या बसस्थानकाचे वर्षभरापुर्वी काम सुरु झाले. ▶▶ पान २ वर

### महायुतीमधील धुसफूस वाढणार?

मुंबई : महायुतीमध्ये निधी वाटप, सत्ता संघर्षावरून वाद सुरू असल्याची चर्चा आहे. पालकमंत्रिपदावरून महायुतीमध्ये धुसफूस सुरू आहे. रायगड, नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीत जोरदार रस्सीखेच सुरू आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४५.०० क्विंटल | २,००० | २,७९० | २,५५४ |
| ज्वारी/हायब्रिड :५७.०० क्विंटल | २,१५१ | २,७०० | २,४३० |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ६.०० क्विंटल | ६,१०० | ६,२४० | ६,१७३ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३३.५० क्विंटल | २,२०१ | २,८२१ | २,६५४ |
| मुग: ४.५० क्विंटल | ५,००० | ७,४०१ | ६,५७७ |
| सोयाबीन: ३४.०० क्विंटल | ४,६०० | ४,८०० | ४,७३५ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ४,५०० | ५,९७० | ५,२३५ |

# घराची दुरुस्ती झाल्यावर धनंजय मुंडे सरकारी बंगला सोडणार

## मुंबईतील माझे घर राहण्यायोग्य नाही, भाड्यानेही घर मिळेना–मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**


धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याला ६ महिने उलटूनही त्यांनी अद्याप सातपुडा हे मंत्र्यांसाठीचे निवासस्थान सोडले नाही. त्यामुळे, धनंजय मुंडेंवर सरकार मेहरबान का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे मुंबईत आपल्याला कुठेही घर नसल्यामुळे बंगला सोडला नसल्याचे स्पष्टीकरण मुंडेंनी माध्यमांशी बोलताना दिले. तसेच स्वत:च्या घराची दुरुस्ती झाल्यावर ते सरकारी बंगला सोडणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.



मुंबई शहरातील सातपुडा हे शासकीय निवासस्थान मी रिक्त केले नसल्याबाबत माध्यमांमध्ये वेगवेगळ्या बातम्या येत आहेत. मुंबईतील ▶▶ पान २ वर

# लालपरीला रक्षाबंधन सण पावला; १३७.३७ कोटींचे उत्पन्न

## सलग सुट्ट्यांमुळे प्रवाशांची महामंडळाच्या बसला पसंती



**मुंबई । प्रतिनिधी**

**यंदाच्या रक्षाबंधन सणानिमित्त एसटी महामंडळाला प्रवाशांनी भरभरून प्रतिसाद दिला. ८ ते ११ ऑगस्ट या चार दिवसांत एसटीच्या प्रवासी उत्पन्नाने उच्चांक गाठला आहे. या कात महामंडळाला तब्बल १३७.३७ कोटी रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळाले आहे.**

सलग सुट्ट्यांमुळे अनेक प्रवाशांनी एसटीने प्रवास करणे पसंत केले. त्यामुळे महामंडळाच्या उत्पन्नात मोठी वाढ झाली आहे. एसटीचा प्रवास सुरक्षित, सोयीचा आणि परवडणारा असल्याने अनेक प्रवाशांनी आपल्या गावी जाण्यासाठी एसटीला पसंती दिली, याचाच फायदा महामंडळाला झाला आहे. एसटी महामंडळाला ८ ते ११ ऑगस्ट या चार दिवसांमध्ये प्रवासी तिकिटांच्या माध्यमातून १३७ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. ▶▶ पान २ वर

### एकाच दिवशी ३९ कोटीचे उत्पन्न

विशेष म्हणजे ११ ऑगस्ट या एका दिवशी तब्बल ३९ कोटी रुपयांचे उत्पन्न महामंडळाला प्रवासी वाहतुकीतून मिळाले आहेत. यंदाच्या आर्थिक वर्षातील हे विक्रमी उत्पन्न असल्याची माहितीरिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

cmyk

## अग्रलेख

# उप राष्ट्रपतींचा ठावठिकाणा नसणे गंभीरच...!

देशात सध्या सगळीकडेच काही ना काही आक्रित घडताना दिसत आहे. निवडणुकीतील मतदानाचे नवनवीन घोळ रोजच उघड केले जात असून फटाक्यांची माळ लागावी तशी प्रकरणे समोर येत आहेत. हे सगळे एकीकडे घडत असतानाच दुसरीकडे आणखीनच एक गंभीर मुद्दा विरोधी पक्षांच्या काही नेत्यांनी उपस्थित केला आहे.

देशाचे माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यापासून त्यांचा ठावठिकाणाच लागेनासा झाला आहे. ते अचानक बेपत्ता झाल्याची तक्रार शिवसेनेचे नेते संजय राऊत आणि त्याआधी राज्यसभेचे खासदार आणि ज्येष्ठ विधीज्ञ कपिल सिब्बल यांनी केली आहे. सिब्बल यांनी तर जगदीप धनखड यांच्या ठावठिकाण्याविषयी शंका व्यक्त करणारे जाहीर निवेदन केले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, जगदीप धनखड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न मी गेल्या अनेक दिवसांपासून करीत आहे; पण त्यांच्याशी माझा संपर्क होऊ शकलेला नाही. एकदा मी केलेला फोन उचलला गेला; पण तो फोन धनखड यांच्याऐवजी त्यांच्या सुरक्षारक्षकाने उचलला आणि त्याने, 'साब आराम कर रहे है' असे उत्तर देऊन फोन ठेवून दिला. नंतर पुन्हा त्याच फोनवर संपर्क साधला असता फोनच उचलला गेला नाही. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेविषयी शंका निर्माण झाली आहे. अशीच शंका शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत जाहीरपणे बोलून दाखवली. धनखड आहेत का त्यांना गायब केले गेले आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या ज्येष्ठ नेत्यांनी व्यक्त केलेली शंका गंभीरच आहे. जो माणूस देशाच्या दुसऱ्या क्रमांकाच्या घटनात्मक पदावर अगदी परवापरवापर्यंत कार्यरत होता त्याच्या ठावठिकाण्याविषयी विरोधी पक्षाच्या नेत्यांनी प्रश्न उपस्थित करणे किंवा आशंका व्यक्त करणे हे निश्चितच गंभीर आहे. धनखड यांनी अचानक राजीनामा का दिला, हे गूढ अजून उकललेले नाही. त्यांच्या राजीनाम्याविषयी विविध वाहिन्यांनी आणि राजकीय तज्ज्ञांनी वेगवेगळ्या घटनांचे संदर्भ देत आपले आकलन मांडले; पण त्यातून नेमक्या वस्तुस्थितीचा उलगडा होऊ शकलेला नाही.

धनखड यांनी आपल्या राजीनामा पत्रात प्रकृतीच्या कारणाचा दाखला दिला आहे, पण ज्या दिवशी त्यांनी राजीनामा दिल्याची बातमी आली त्या दिवशी ते दिवसभर विविध बैठकांमध्ये व्यस्त होते त्यामुळे त्यांच्या प्रकृतीचे कारण तितकेसे खरे नाही हे एव्हाना सगळ्यांनाच समजून चुकले आहे. आपल्या राजीनाम्याविषयी खुद्द धनखड पत्रकारांशी बोलतील किंवा निदान सोशल मीडियावरून तरी व्यक्त होतील अशा प्रतीक्षेत अनेक जण होते, पण गेल्या अनेक दिवसांत ना ते सोशल मीडियावर व्यक्त झाले, ना त्यांनी एखादी प्रेस कॉन्फरन्स घेतली. मग धनखड हे अचानक असे मौनात का गेले यावरून शंका उपस्थित केल्या जाऊ लागल्या. ज्या दिवशी त्यांनी राजीनामा दिला त्या दिवशी त्यांचे घर आणि कार्यालय सील केले गेले असल्याच्या बातम्या काही ठिकाणी प्रसारित झाल्या होत्या. ही कारवाई कोणाच्या सांगण्यावरून कोणी केली त्याचाही उलगडा झाला नाही. त्यानंतर धनखड यांचा राजीनामा हा विषय बाजूला टाकला गेला आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांवरूनही तो विषय गायब झाला. सरकार किंवा दूरचित्रवाणी वाहिन्यांकडून धनखड यांच्या राजीनाम्याला अजिबातच महत्त्व दिले गेले नाही ही बाब एक वेळ समजून घेता येईल, पण धनखड यांचे सार्वजनिक दर्शनच बंद होणे किंवा त्यांचा ठावठिकाणाच लागेनासा होणे हे विचित्रच लक्षण मानले पाहिजे. माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे नुकतेच निधन झाले, त्यांच्या निधनाच्या आधी त्यांनी एक व्हिडिओ तयार केला होता आणि तो नंतर सोशल मीडियावर प्रसारित झाला. त्यात ते आपल्याला सरकारकडून खोटेपणाने गुंतवले जात असल्याच्या तक्रारी करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ बाहेर आला. मात्र, जगदीप धनखड यांचे एकही निवेदन किंवा दर्शन होऊ शकले, त्याविषयी देशवासीयांना आणि देशातील प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांना चिंता वाटणे स्वाभाविकच होते. उपराष्ट्रपती पदावरचा माणूस अचानक असा सार्वजनिक जीवनातून गायब होणे हे संपूर्ण देशासाठी आणि देशातील सध्याच्या एकूणच व्यवस्थेविषयी शंका निर्माण करणारेच आहे, ही शंका दूर करण्यासाठी सरकारनेच पुढाकार घेणे गरजेचे होते.

# सरपंच ॲड.मयूर आंधळे यांच्या पुढाकाराने हरित अभियान अंतर्गत १ हजार झाडांची लागवड

## रुई गावाने भारत समृद्ध बनुया वसुंधरेला वाचूयाचा वृक्ष लागवडीने दिला संदेश

**वडवणी।प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यामध्ये मागील काही दिवसापूर्वी हरित बीड अभियान या सामाजिक उपक्रम राबविले आहे यामध्ये रुई पिंपळा या आदर्श गावाने देखील सहभाग नोंदवत भारत समृद्ध बनूया,वसुंधरेला वाचूया हा लोकमंत्र देत गावचे उच्चभूषित कार्यतत्पर सरपंच ॲड.मयूरशेठ आंधळे यांच्या पुढाकाराने गावात १ हजार ६० वेगवेगळ्या झाडांची लागवड करून त्यांचे संगोपनाची जबाबदारी देखील त्यांनी घेतली आहे त्यामुळे हे गाव लवकरच ग्रीन व्हिलेज म्हणून महाराष्ट्राच्या पटलावर देखील येणार आहे हा उपक्रम राबविल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक देखील होत आहे ग्रामस्थ देखील समाधान व्यक्त करत आहेत.**



याबाबत अधिक माहिती अशी की,दि.७ ऑगस्ट २०२५ रोजी हरित बीड अभियान हा सामाजिक उपक्रम राबवला आहे.या उपक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित पवार यांनी या उपक्रमाची सुरुवात केली आहे या उपक्रमात वडवणी तालुक्यातील मौजे रुई (पिंपळा) या आदर्श गावाने देखील लोकसहभाग नोंदवला आहे. गावचे आदर्श उच्चभूषित,कार्यतत्पर,सरपंच ॲड.मयूरशेठ आंधळे यांच्या पुढाकारामुळे या अभियानाला मोठे स्वरूप प्राप्त झाले यामध्ये गावाच्या मुख्य रस्त्याच्या दुतर्फा बाजूने आंबा,नारळ,जांभूळ,चिकू,फणस यासह मुख्यत्वे फळझाडांची लागवड करून त्यांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी ट्रीगार्ड व पाण्यासाठी ड्रीपची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. तर गायरान, डोंगर व माळरान जागेवर वड,पिंपळ,करंज,चिंच,बोर, लिंब,नांदूर इत्यादी झाडांची लागवड केली आहे. गावातील सार्वजनिक मंदिर परिसरामध्ये चाफा,जास्वंद,मोगरा,कणेरी या फुल झाडांची लागवड तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसर व श्री.गैबीसाहेब मंदिर परिसर नवीन स्मशानभूमी परिसर व गायरान,माळरान परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. या सामाजिक उपक्रमात गावातील सर्व समाज घटकांचा उत्स्फूर्त लोकसहभाग व प्रतिसाद देखील मिळाला आहे या कार्यक्रमात गावातील सर्व ज्येष्ठ नागरिक,युवा तरुणवर्ग शाळेतील विद्यार्थी व सर्व ग्रामपंचायत पदाधिकारी,कर्मचारी व ग्रामस्थ यांचे टीमवर्क आणि लोकसहभागातून चांगल्या पद्धतीने राबवले आहे तर गावचे उच्चभूषित,कार्यतत्पर,कर्तव्यदक्ष सरपंच ॲड.मयूरशेठ आंधळे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने राबविण्यात आला असल्याने हे गाव ग्रीन व्हिलेज म्हणून लवकरच पटलावर येणार असल्याचे दिसून येत आहे तसेच या सामाजिक उपक्रमाचे बीड जिल्हा अधिकारी श्री.विवेक जॉन्सन बीड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जितेन रहमान सर,वडवणीचे पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष बीडीओ श्री.विठ्ठलजी नागरगोजे साहेब यांचे मार्गदर्शन लाभले असून केलेल्या कामाचे विशेष कौतुक पण केले आहे.

### ऑक्सीजन पार्क उभारणार–ॲड.मयूर आंधळे

पुनर्वसित गांव म्हणून रुईचा नाम उल्लेख होतो.परंतु या गांवचा सर्वांगीण विकास जिल्हा नव्हे,राज्याच्या पातळीवर घेऊन जाण्याचा आमचा मानस आहे या सामाजिक उपक्रमांतर्गत दुसऱ्या टप्प्यात लवकरच आपण सहभाग घेऊ आपण सर्व एक,लावू रोप अनेक ,वृक्षाचे करा संवर्धन,धरतीचे होईल नंदनवन,झाडांना द्या साथ, प्रदूषणावर करतील मत..! या ओळींचा संदेश घेऊन गांवात घनदाट वृक्ष प्रकल्प व ऑक्सिजन पार्क उभारणार असल्याची माहिती गावचे उच्चभूषित,कार्यतत्पर, कर्तव्यदक्ष,अभ्यासू लोकप्रिय सरपंच ॲड.मयूरशेठ आंधळे यांनी माहिती दिली.



# तलवाडा पोलिसांची अवैध दारू विक्रात्यावर कारवाई

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील जातेगाव येथे अवैधरीत्या देशी दारू विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळताच सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक कैलास अन्नदास ,पोलीस हवालदार मोहसीन शेख , पोलिस हवालदार नारायण काकडे,पोलीस अंमलदार विठ्ठल राठोड, पोलीस अंमलदार भीमसेन जाधव, यांनी सापळा रचून जातेगाव येथून दिं.१३/८/२०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता सुमारास छापा मारला असता ४९६० रुपयाचा देशी दारू चा मुद्देमाल जप्त करून दारु बंदी कायदेप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तलवाडा पोलीस करीत आहेत.

# मनोज जरांगे गणेशोत्सवात दंगली भडकवणार

## लक्ष्मण हाके यांचा गंभीर आरोप, शरद पवारांवरही टीका



### ..तर महाराष्ट्र कायमस्वरुपी बंद राहील–जरांगे

आमचे आंदोलन शांततेत होणार आहे. फडणवीस यांनी जर तसे काही करण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्र कायम स्वरुपी बंद राहील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही मोठा त्रास सहन करावा लागेल असा थेट इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

**मुंबई । प्रतिनिधी**

**जरांगे पाटील गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत दंगली भडकवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला आहे. येत्या २९ ऑगस्ट रोजी मुंबईत होणाऱ्या मराठा आरक्षण मोर्चावरुन आरोप-प्रत्यारोप करण्यात येत असून हाके यांनी शरद पवारांवरही टिका केली आहे.**

येत्या २९ ऑगस्टला मराठा समाजाचा मोर्चा मुंबईत धडकणार आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे आणि सगेसोयरे अध्यादेश लागू करावा या प्रमुख मागण्यांसाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी मोर्च्याची घोषणा केली आहे. यानुसार येत्या २९ ऑगस्टला मराठा समाजाने मुंबईत यावे, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्चावर जोरदार टीका केली आहे. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील हे गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत आंदोलन करून दंगली भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत, असा गंभीर आरोप ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला आहे. हाके यांनी शरद पवारांवरही टिका केली असून त्यांना ओबीसींचे देणेघेणे नसल्याचे म्हटले आहे. तसेच ओबीसी जोडो संघर्ष अभियान सुरु करणार असल्याचेही ते म्हणाले.

# डॉ.तेजस दुनघव यांनी वाचविले अपघातातील जखमी प्राण्याचे प्राण

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील बसस्थानका समोर शनिवार रोजी रात्री १२:१५ वाजण्याच्या सुमारास जालना रोडवर एका अज्ञात वाहनाने मोकाट जनावरांसह दोन म्हशींच्या पिल्लांना धडक दिली. यात मोकाट जानावरांसह म्हशींची दोन्ही पिल्ले गंभीर जखमी झाल्याची माहिती डॉ. तेजस दुनघव यांना मिळताच दुनघव यांनी तत्काळ जखमी जनावरांवर उपचार केल्यामुळे जीवदान मिळाले. डॉ दुनघव यांनी कामामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.**

बीड शहरातील बस स्थानकासमोर नेहमीच मोकाट जनावरांचा वावर असतो. काही प्रसंगी हे जनावरे रस्त्यावर ठाण मांडून बसलेले असतात. त्यांच्यामुळे अनेक वेळा अपघात झालेले आहेत.शनिवार रोजी रात्री १२:१५ वाजण्याच्या सुमारास जालना रोडवर एका चारचाकी वाहन मोकाट जनावरांसह दोन म्हशींच्या पिल्लांना जोरात धडक देऊन ही चारचाकी दुभाजकावर गेली. या अपघातात दोन म्हशीचे पिल्ले गंभीर जखमी अवस्थे मध्ये पडले होते. या घटनेची माहिती मिळताच जनावराचे डॉक्टर तेजस दुनघव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या जनावरांवर उपचार करायला सुरुवात केली. अगदी वेळेत उपचार सुरू झाल्यामुळे गंभीर जखमी जनावरांना वाचवण्यात डॉक्टर दुनघव यांना यश आले. मोकाट गंभीर जखमी झालेल्या या जनावरांवर उपचार करून त्यांना जीवदान देणाऱ्या डॉ. दुनघव यांनी केलेल्या या कामामुळे जनावराचे प्राण वाचले आहेत. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# फक्त महिलांनाच नाही, पुरुषांनाही होतात मूड स्विंग्स–डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**मूड स्विंग्स हा शब्द ऐकताच आपल्या डोळ्यांसमोर सहसा महिलाच येतात. मासिक पाळी किंवा हार्मोनल बदलांमुळे महिलांमध्ये भावनिक चढ–उतार होतात, हा एक सर्वमान्य समज आहे; पण हाच भावनिक गोंधळ पुरुषांमध्येही होतो, ही वस्तुस्थिती अनेकदा दुर्लक्षित केली जाते. पुरुषांच्या मूड स्विंग्सला चिडचिडेपणा किंवा राग समजून त्याकडे कानाडोळा केला जातो.खरे तर, मूड स्विंग्स हा एक सार्वत्रिक मानवी अनुभव आहे आणि पुरुषही याला अपवाद नाहीत. शारीरिक, हार्मोनल आणि मानसिक कारणांमुळे त्यांच्यातही भावनिक चढ–उतार येतात, जे त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनावर खोलवर परिणाम करतात. पुरुषांमधील मूड स्विंग्समागे अनेक शारीरिक आणि जीवनशैलीशी संबंधित कारणे असू शकतात, असे तज्ज्ञ सांगतात. टेस्टोस्टेरॉनची घट हे सर्वात प्रमुख कारण आहे. विशेषत:, वयाच्या तिशीनंतर पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉन या हार्मोनची पातळी हळूहळू कमी होऊ लागते. यामुळे चिडचिड, थकवा आणि नैराश्य यासारखी लक्षणेदिसू शकतात.**



या स्थितीला अँड्रोपॉज असेही म्हणतात. कामाचा दबाव, आर्थिक चिंता आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळेही तणावाची पातळी वाढते, ज्यामुळे मूडमध्ये वारंवार बदल होतात. पुरेशी झोप न मिळाल्यास हार्मोन्सचे संतुलन बिघडते आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. खराब आहार, मद्यपानाचे अतिसेवन आणि बैठी जीवनशैली या समस्येला आणखी वाढवू शकते. पुरुषांमधील मूड स्विम्सची लक्षणे अनेकदा महिलपिक्षा वेगळ्या प्रकारे दिसून येतात. महिलांमध्ये उदासी किंवा रडण्याचे प्रमाण जास्त दिसू शकते, तर पुरुषांमध्ये ते चिडचिड आणि अचानक राग येणे, सततचा थकवा, पूर्वी आवडणाऱ्या गोष्टींमध्ये किंवा कामांमध्ये मन न लागणे, झोप न लागणे किंवा खूप जास्त झोप येणे, कोणत्याही कामावर लक्ष केंद्रित/करण्यात अडचण येणे, भूक कमी लागणे किंवा प्रमाणापेक्षा जास्त खाणे अशा कलक्षणांमधून दिसते. जर कोणामध्ये ही लक्षणे सातत्याने दिसत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

# पान १ वरून...

### परराज्यातून येणाऱ्या दुग्धजन्य

तरी सुध्दा राज्यात अजूनही भेसळयुक्त दुध मोठ्या प्रमाणात असल्याचे म्हटले जात आहे. तसेच दुग्धजन्य पदार्थांमध्ये सुध्दा भेसळ असल्याचा संशय असून प्रशासनासह शासन याबाबत गांभिर्याने पाऊले उचलत आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी याबाबत मोठी घोषणा केली असून परराज्यातून येणाऱ्या सर्व दुग्धजन्य पदार्थांची तपासणी केली जाणार आहे. यासंदर्भात राज्यव्यापी भेसळविरोधी मोहिमेचा श्री. झिरवाळ यांच्या हस्ते शुभारंभ झाला. यावेळी ते म्हणाले, नागरीकांना चांगले आणि दर्जेदार अन्न मिळावे यासाठी शासन प्रयत्नशिल असून परराज्यातून येणारे दुध आणि दुग्धजन्य पदार्थांची यापुढे तपासणी केली जाणार असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

----------

### जिल्ह्यातील दूध उत्पादक

भाव पडल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले होते. दुधाला अनुदान द्यावे अशी मागणी करण्यात आली होती. राज्य सरकारने प्रति लि. ५ रूपये अनुदान घोषीत केले होते. हे अनुदान आता आले असून राज्यातील ४ लाख ४२ हजार दुध उत्पादक शेतकऱ्यांना १५४९ कोटी २७ लाख रूपयांचे अनुदान मिळाले आहे. बीड जिल्ह्यासाठी २१ कोटी रूपये आले आहेत. हे पैसे संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले आहेत. दरम्यान राज्यातील आणखीन ७ हजार ३५६ शेतकऱ्यांचे ३७ कोटी ३१ लाख रूपये अनुदान प्रलंबित राहिलेले आहे हे अनुदान कधी मिळणार असा प्रश्न ही उपस्थित होत आहे.

-----------

### बॅनरवर गुन्हेगारांचा फोटो झळकल्यास

पक्षेपार्ह नसावा. गुन्हेगार व गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारे, गुन्हेगारांचे फोटो त्यावर नसावेत, असा थेट कागदोपत्री आदेशच काढला आहे.

----------

### मस्साजोगच्या सरपंचांना

दरम्यान पंधरा दिवसानंतरच अवकाळी पाऊस आल्यामुळे नदीच्या पात्रात व तलावातील पाण्याची पातळी वाढली. यामुळे मस्साजोग शिवारातील बोअर व विहिरीतील पाणी पातळी वाढत सारा शिवार पाणीदार झाला होता. याची दखल जिल्हाधिकारी यांनी घेऊन याचा अहवाल दिल्ली येथील जलशक्ती मंत्रालयाला पाठवला.गावासाठी केलेल्या या कामाची दखल स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली असून मस्साजोगच्या सरपंच वर्षा सोनवणे यांच्यासह त्यांचे यजमान आनंदराव सोनवणे यांना स्वातंत्र्यदिनी दिल्ली येथे होणा-या स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहण सोहळ्याला उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले आहे.

-------------

### चकलांब्यात वाळू

वाळू तस्करांवर मोठ्या कारवाया केल्या आहेत. मंगळवारी देखील (दि.१२/०८/२५) रोजी देखील पंचांळेश्वर येथे नदी पात्रात दोन ट्रॅक्टर चोरटी वाळू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पाटील यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना करत कारवायाचे आदेश दिले.त्यानुसार पोलिसांनी छापा मारला असता यावेळी वाळू तस्करी करणारे दोन टॅक्टर आले.त्यानुसार दोन्ही वाहने ठाण्यात आणण्यात आली असून या कारवाईत ११ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,पोलीस उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील चांदमारे पोशी / हनुमान इंगोले पोशी / सुरेश सुरवसे पोशी/२३१ प्रशांत कल्याण घोंगडे आदींनी केली आहे.

------------

### रेल्वे सुरू होण्यापूर्वीच

यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे रेल्वे बोर्डाला कोट्यावधी रुपयाचा तोटा सहन कराव्या लागत आहे यापूर्वी सराटा येथील पूल चुकीच्या पद्धतीने बांधण्यात आल्याचे बोर्डाच्या निदर्शनास आल्यानंतर हा पूल पाडण्यात आला मात्र त्यामुळे लाखो रुपये पाण्यात केली आहेत हे प्रकरण ताजे असतानाच या मार्गावर अहिल्यानगर पासून नारायण डोह कडा आष्टी उदनवाडी रायमोहा बीड वडवणी या ठिकाणच्या रेल्वे स्थानकाचे आणि इमारतीचे काम पूर्ण झाले आहे मात्र सध्या पावसाळा असल्याने गुत्तेदाराची काम या पावसाने उघडे पाडले आहे रायमोह येथील रेल्वे स्थानकाची इमारत निकृष्ट बांधकामामुळे पावसात गळू लागली आहे विशेष म्हणजे गेल्या सहा महिन्यापूर्वीच या रेल्वे स्थानकावर रेल्वे इंजिनची चाचणी घेण्यात आली सहा महिन्यापूर्वी उद्घाटन झालेल्या या रेल्वे स्थानकाला निकृष्ट कामामुळे गळती लागली असून पाऊस आला की पाणी इमारतीमध्ये येत आहे याशिवाय इमारतीचे पोकळे देखील आता पडू लागले आहेत तेव्हा या निकृष्ट कामामुळे रेल्वे बोर्डाला कोट्यावधी रुपयाचा तोटा सहन करावा लागत असल्याचे यावरून दिसत आहे सामाजिक कार्यकर्ते विनोद चव्हाण यांनी या रेल्वेस्थानकाचे पाहणी केली असता ही गंभीर बाब समोर आली आहे यावर आता रेल्वे बोर्ड काय निर्णय घेणार याकडे लक्ष लागून आहे

----------

### उपअभियत्यांस डावलून सहाय्यकाकडे

कारभार ज्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाअंतर्गत चालतो त्या विभागाला सक्षम अधिकारी असणे गरजेचे आहे मात्र गेल्या तीन-चार वर्षात या ठिकाणी कार्यकारी अभियंता म्हणून शाखा अभियंता किंवा उपअभियंता यांच्याकडे कारभार देऊन कामं भागवण्यात आले. विद्यमान प्रभारी कार्यकारी अभियंता धाबेकर हे सेवानिवृत्त झाल्याने रिक्त झालेल्या पदावर बीडकर या शाखा अभियंत्याला पदभार देण्यात आला आहे. बीडकर यांची शाखा अभियंता म्हणून नियुक्ती होऊन सहा महिने देखील झालेले नाहीत, त्यांचे प्रशिक्षण देखील पूर्ण झालेले नाही. अशावेळी एवढ्या मोठ्या पदावर अनुभव नसलेल्या व्यक्तीकडे पदभार देऊन सिइओ कोणाचे भले करत आहेत असा प्रश्न निर्माण झाला आहे. बीड जिल्हा परिषदेत जवळपास १०० अधिकारी आणि कर्मचारी यांचेकडे अतिरिक्त कार्यभार आहे. बीडीओ, बीईओ, कार्यकारी अभियंता,आदी सर्व ठिकाणी रिक्त पदेअसल्यामुळे अतिरिक्त कारभार देण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार ज्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत, तिथे नियमानुसार पात्रता नसलेल्या लोकांना नियुक्त करणारं असतील तर स्वच्छ आणि पारदर्शक कारभार कसा चालेल? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

-------------

### बीडचे नवे बसस्थानक प्रवाशांसाठी खुले

प्रवाशांची सोय व्हावी यासाठी पर्यायी बसस्थानकातून बसेस सोडण्यात येत होत्या. सध्या पावसाळा सुरु असल्याने पर्यायी बसस्थानकात मोठ्या प्रमाणात चिखल असल्याने प्रवाशांची गैरसोय होत होती. तसेच नव्या बसस्थानकाचे ८० टक्के काम पुर्ण झाले असल्याने एका बाजूने नविन बसस्थानकातून बसेस सोडण्यात येत आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय दुर झाली असून लवकरच दोन्ही बाजूने बसेस सोडण्यात येणार असल्याचे समजते.

---------

### लालपरीला रक्षाबंधन सण पावला;

यंदा रक्षाबंधन आणि त्याला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे प्रवासासाठी प्रवाशांनी एसटीला पसंती दिल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

-----------

### घराची दुरुस्ती झाल्यावर धनंजय

माझी सदनिका सध्या राहण्यायोग्य नसून, त्याठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू आहे. याशिवाय माझ्या लहान मुलीची शाळा याच भागात असून माझ्या विविध आजारांवरील उपचारार्थ देखील मला मुंबईत राहणे गरजेचे आहे. मात्र, या परिसरात तातडीने भाड्याने घर मिळणे सध्या कठीण आहे, माझा शोधही सुरु आहे, असे स्पष्टीकरण आमदार धनंजय मुंडे यांनी दिले आहे. तसेच, माझ्या सदनिकेचे काम पूर्ण होताच मी शासकीय निवासस्थान रिक्त करणार असून, तशी शासनाकडे विनंती देखील केली आहे, अशी माहितीही धनंजय मुंडेनी दिली आहे.

----------------

## थोडक्यात....



### कैलास तांगडे यांची पंचायत विभागात कनिष्ठ प्रशासनाधिकारी पदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे वरिष्ठ सहाय्यक कैलास तांगडे यांची जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागात कनिष्ठ सहाय्यक प्रशासन अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे त्यांच्या या नियुक्ती बद्दल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) किशोर काळे यांनी त्यांचे स्वागत केले. तांगडे बापू यांची बीड जिल्हा परिषदेत २५ वर्षे सेवा झाली आहे. यापूर्वी त्यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग, सामान्य प्रशासन विभाग, पंचायत विभाग आणि पंचायत समिती, पाटोदा येथे उल्लेखनीय काम केले आहे. अनुभवी, अभ्यासू, कार्यतत्पर आणि प्रामाणिक कर्मचारी म्हणून त्यांना ओळखले जाते. यांच्या पदोन्नतीमुळे अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### अनिल पुरबूज यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



शहरातील रंगार गल्ली झेंडा चौक भागातील रहिवाशी असलेले अनिल गोविंदराव पुरबूज यांचे वृद्धापकाळाने दि.१३ ऑगस्ट बुधवार रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर सिंदफणा स्मशानभूमीत दुपारी १:३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. मनमिळाऊ स्वभावाच्या असल्याने अनिलराव सर्वत्र परिचित होते. त्यांच्या पाश्चात तीन भाऊ,एक बहीण,असा परिवार आहे.

### एक गाव, एक गणपती उपक्रमांत सहभागी व्हावे सहायक पोलिस निरीक्षक मंगेश साळवेंचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. गावागावात तयारीला वेग आला आहे. या – पार्श्वभूमीवर अंभोरा पोलिस ठाण्याचे एपीआय मंगेश साळवे यांनी एक गाव, एक गणपती ही संकल्पना राबवण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सांगितले की, गणपती म्हणजे एकतेचे प्रतीक. मात्र, वेगवेगळ्या मंडळांनी वेगवेगळे गणपती बसवल्यास स्पर्धा निर्माण होते. मतभेद वाढतात. काही वेळा वाद होतात. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. निरपराध लोकांना त्रास होतो.

साळवे यांनी म्हटले की, बाप्पाच्या नावाने वाद घालणे ही भक्ती नाही. एक गाव, एक गणपती केल्यास गावकरी एकत्र येतील. जात, धर्म, पंथ विसरून गुण्यागोविंदाने राहतील. अनेक मंडप, मूर्ती, सजावट, ढोल-ताशा यावर होणारा खर्च वाचेल. वाचलेला पैसा शाळा, आरोग्य, पाणी, रस्ते, संस्कार शिबीर, कीर्तन सेवा, अन्नदान, गरीब व अनाथ कुटुंबांच्या मदतीसाठी वापरता येईल. उत्सवात होणाऱ्या गैरसोयी, आवाज प्रदूषण कमी होईल. आरोग्य धोक्यात येणार नाही. पोलिस प्रशासनालाही सुरक्षा व्यवस्था नीट राखता येईल. गावातील गणपती हा संपूर्ण गावाचा असावा. कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा मंडळाचा नसावा.

# जिल्हा रुग्णालयाच्या वाढीव इमारतीच्या कामात २५ महिन्यांचा विलंब

## वंचित बहुजन आघाडीचे फुले वाहा आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

**शासकीय जिल्हा रुग्णालय, बीड येथील वाढीव २०० खाटांच्या इमारतीच्या बांधकामासंदर्भात शासनाने प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर सन २०२१ मध्ये विनायक कन्स्ट्रक्शन, आंबेजोगाई यांना कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. कार्यारंभ आदेशात २४ महिन्यांत काम पूर्ण करण्याची अट होती. मात्र अंदाजपत्रकानुसार काम न करता, तसेच मुदतवाढ घेतली की नाही याबाबतही संशय निर्माण झाला आहे.**

मुख्य अभियंता (सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर), अधीक्षक अभियंता (सार्वजनिक बांधकाम मंडळ, धाराशिव) आणि कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक एक, बीड) यांनी योग्यवेळी पाहणी केली नसल्याने, गुत्तेदार मनमानी पद्धतीने काम करत राहिला. परिणामी, २०२१ मधील आदेशानंतर आज २०२५ ला देखील हे काम पूर्ण झालेले नाही. २४ महिन्यांच्या मुदतीवर तब्बल ४९ महिने





उलटून गेले असून २५ महिन्यांचा जाणीवपूर्वक विलंब झाला आहे. या गंभीर विलंबासाठी गुत्तेदारावर दंडात्मक कारवाई करून काळ्या यादीत टाकणे आवश्यक होते. परंतु गुत्तेदार आणि अधिकाऱ्यांमधील 'अर्थपूर्ण संबंधांमुळे' अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. या निष्क्रीय भूमिकेचा निषेध करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीकडून थेट इमारतीखाली आंदोलन करण्यात आले. मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या प्रतीकात्मक पुतळ्यांना दगडांना चिकटवून हार घालण्यात आले व फुलांचा वर्षाव करून निषेध नोंदवला गेला. वंचित बहुजन आघाडीने स्पष्ट मागणी केली की, २५ महिन्यांच्या अतिरिक्त विलंबाबाबत विनायक कन्स्ट्रक्शनवर तात्काळ दंडात्मक कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकावे. यापूर्वीच बीडचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी जिल्हा रुग्णालयाला अचानक भेट देऊन, तेथील अनियमितांवर अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. त्याच पद्धतीने अजित दादा पवार यांनी या इमारतीला प्रत्यक्ष भेट देवून, मुदतीत काम झाले आहे का नाही याची स्वतः पाहणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. या आंदोलनावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा महासचिव खंडू देवराव जाधव, सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष रोहन मगर, महिला जिल्हा उपाध्यक्ष पुष्पाताई तुरुकमाने, सह संघटक अर्जुन जंवजाळ, प्रसिद्धी प्रमुख राजेश कुमार जोगदंड, तालुका अध्यक्ष किरण वाघमारे, शहर अध्यक्ष लखन जोगदंड, शहर महासचिव संदीप जाधव, कुमार साबळे, मिलिंद सरपते, प्रेम कांबळे, आकाश साबळे, विवेक मस्के व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगाव जिल्ह्यातील विकासाचं केंद्र व्हावं यासाठी प्रयत्न करणार – आ. प्रकाश सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

**केंद्र व राज्य सरकारच्या मदतीने माजलगाव मतदार संघात विकासाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. हे शहर बीड जिल्ह्यातील विकासाचं केंद्र व्हावं यासाठी मी आमदार या नात्याने प्रयत्न करणार आहे. शहरातील आरोग्य व्यवस्था ही पहिल्यापेक्षा अधिक सक्षम होत आहे. माझ्या परिवारातील एक सदस्य डॉ. शेख मोहम्मद तौसीफ याने पल्स केअर हे तीस बेड चे हॉस्पिटल उघडले याचा मला सार्थ अभिमान आहे असे गौरवोदगार कार्यक्रमाचे उद्घाटक माजी मंत्री तथा आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी काढले.**

माजलगाव तालुक्यातील भूमिपुत्र डॉ. शेख मोहम्मद तौसीफ वासेफोद्दीन (एमबीबीएस, जनरल फिजीशीयन व कन्सल्टींग डायबेटोलॉजीस्ट) यांच्या पल्स केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा भव्य उद्घाटन सोहळा रविवारी (दि. १०) रोजी दुपारी पार पडला. यावेळी प्रमुख उद्घाटक म्हणून बोलताना आ. सोळंके बोलत होते. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिति चे अध्यक्ष ओमप्रकाशजी शेटे हे होते. याप्रसंगी बहुजन विकास मोर्चा चे संस्थापक बाबूराव पोटभरे, माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस, नितीन



नाईकनवरे, माजी जिला शल्य चिकित्सक डॉ. सुरेश साबळे, राष्ट्रवादी कांग्रेस चे वरिष्ठ नेते अच्युतराव लाटे, आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे, माजी नगराध्यक्ष नासेर पठाण, छत्रपती सह. साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहनदादा जगताप आदिंची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना आ. सोळंके म्हणाले की, मी १९९९ मध्ये या शहरात आलो. ते आजतागायत खूप बदल झाले. हे शहर गतीने वाढणारं शहर असून शांततेत जगणार शहर आहे. येथील जनतेच माझ्यावरती विश्वास आहे म्हणून मला आमदार म्हणून पाचव्यांदा निवडून दिले आहे. नसता माजलगावची परंपरा आहे. एकदा आमदार झालं की घरी नंतर नाव ही काढत नाहीत. असे म्हणत त्यांनी विरोधकांना टोला लगावला. मतदार संघात जास्तीत जास्त सुविधा कशा निर्माण करता येतील, शेतीवर आधारित बहुसंख्य वर्ग कसा सुखी समाधानी करता येईल यासाठी माझा प्रयत्न असतो असे सांगून त्यांनी शासनाच्या प्रयत्नातुन आरोग्य व सिंचन सुविधा कशा उपलब्ध केल्या जात आहेत हे सांगितले. पुढे बोलताना डॉ.शेटे म्हणाले की, समाजातील गरीब व सर्व सामान्य लोकांमध्ये शासकीय योजना बाबत जनजागृतीचा आभाव आहे. राज्य शासनाने राज्यातील सर्व नागरिकांना आरोग्य सेवा पुरवण्याचा निर्णय घेतला आहे. यात सर्व रेशन कार्डधारक पात्र असतील. एका कुटुंबाला ५ लाखापर्यंत मोफत उपचार आयुष्यमान भारत योजनेमार्फत करण्यात येते. प्रत्येक नागरिकापर्यंत आयुष्मान भारत योजेनेचा लाभ मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यासाठी आरोग्य विभागाकडून आवश्यक असणारे सर्व सहकार्य करण्यात येईल. या योजना राबविण्यासाठी अशा हॉस्पिटलची नितांत गरज आहे. डॉ. शेख मोहम्मद तौसीफ व डॉ. आफरीन तौसीफ शेख यांनी शहरात सुसज्य हॉस्पिटल उभारले त्यांनी रितसर अर्ज करावा मी सहकार्य करीन. कार्यक्रमाचे बहारदार सूत्र संचालन नारायण झोडगे यांनी केले. तर आभार प्रदर्शन शेख वासेफोद्दीन यांनी केले.

### जय भवानी महाविद्यालयात हर घर तिरंगा रॅली व एडस जनजागृती अभियान





पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व जिल्हा एड्स नियंत्रक प्रतिबंध कक्षाच्या वतीने हर घर तिरंगा रॅली जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले पाटोदा शहरातून सुमारे दोनशे विद्यार्थिनी या रॅलीत सहभाग घेऊन एड्स आरोग्याविषयी जनजागृती केली या कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे मार्गदर्शन प्राचार्य डॉ विश्वास कदम व प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांनी रॅलीला हिरवा ध्वज दाखवू केली पाटोद्यातील मुख्य रस्त्यावरून या रॅलीचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे प्राध्यापक नारायण फुने बी बी लोखंडे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ शिवाजीराव काकडे प्राध्यापक चव्हाण यांनी परिश्रम घेतले या रॅलीत महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवक विद्यार्थी प्राध्यापक होऊ शकत तर कर्मचारी सहभागी झाले नंतर महाविद्यालयात या रॅलीची सांगता करण्यात आली व प्राचार्य यांनी मार्गदर्शन करून ही सांगता झालीपी लोखंडे


## पान ६ वरुन...


### सादोळा येथील लोणी-सावंगी

आज वेगळे चित्र समोर दिसले असते.मात्र तालुक्याला सुजलाम सुफलाम करणारी योजना तेरा वर्षांपासून अर्धवट अवस्थेत आहेत.याला प्रशासनाचा हजगर्जीपणा जबाबदार की लोकप्रतिनिधींची हलगर्जीवृत्ती,असा प्रश्न संतप्त शेतकरी विचारत आहेत.या प्रश्नावर तातडीने तोडगा निघावा म्हणून शेतकरी संघर्ष समितीचे नेते भाई गंगाभिषण थावरे यांच्या नेतृत्वाखाली दि १५ ऑगस्ट रोजी स्वंतत्र दिनी उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांना 'गाडी अडवा'आंदोलन करून निवेदन देण्यात येणार आहे. तसेच शेतकरी संघर्ष समितीने असा ही इशारा दिला आहे की,लोणी-सावंगी उपसा जलसिंचन योजना पूर्ण न झाल्यास पुढील काळात व्यापक आंदोलन पेटवले जाईल.

### संभाजी ब्रिगेडच्या बीड

वर्षांपासून पुरोगामी चळवळीत सक्रिय आहेत. त्यांची सामाजिक व राजकीय वाटचाल या सर्व कार्याची दखल घेऊन संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड.मनोज आखरे यांनी प्रा शशिकांत कन्हेरे यांची पुन्हा एकदा बीड जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड करून त्यांना शुभेच्छा दिल्या.दरम्यान आपल्या निवडीविषयी आभार मानून बोलताना प्रा शशिकांत कन्हेरे यांनी सांगितले की,संभाजी ब्रिगेडचे संघटन वाढीवर भर देणार आहोत. समाजातील प्रश्न सोडविणार आहोत.तसेच सामान्य माणसांवर होणा-या अन्याय-अत्याचारा विरूद्ध लढण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून २४ तास जनसेवेसाठी उपलब्ध असेन असे नवनिर्वाचित बीड जिल्हाध्यक्ष प्रा शशिकांत कन्हेरे यांनी सांगितले.त्यांच्या या निवडीबद्दल मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, विविध सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व आदींनी अभिनंदन केले आहे.

### तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये

असे सर्व गावातील गावकरी मंडळींनी प्रयत्न केले पाहिजे डिजे डीजे वाजु नये असे मत या बैठकीत सपोनि मनोज निलंगेकर यांनी मांडले त्यांनी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या अडचणी जाणुन घेऊन त्यांना काही सुचना हि केल्या त्या सुचनांचे जे गणेश मंडळ उल्लंघन करेल त्या मंडळावर सुध्दा कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची हि नोंद गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी घ्यावी असेही त्यांनी इशारा दिला आहे.यावेळी माजी जि,प, सदस्य अँड सुरेश हात्ते,माजी पंचायत समिती सदस्य शाम कुंड माजी जि,प, सदस्य युवराज डोंगरे माजी सरपंच विष्णू हात्ते,माजी उपसरपंच अक्रम सौदागर ,नजीर कुरेशी, मोलाना जाकेर सिद्दिकी,शेख अफसर, दादाराव रोकडे, गोपाल चव्हाण, धोडिबा हातागळे, विनोद हातागळे,पत्रकार बांधव, गावातील सर्वच गणेश मंडळाचे पदाधिकारी,व गावातील नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते शांतता समितीचे बैठकीचे आभार उपनिरीक्षक कैलास अन्नादास यांनी मानले

गणेश मंडळांचा गुणगौरव सोहळा होणार

तलवाडा पोलीस स्टेशन जे गणेश उत्सव मंडळ प्रथम दुतीय व तृतीय क्रमांक पटकावील त्यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करेल त्याच बरोबर जे तलवाडा पोलीस स्टेशन गणेश मंडळांची निवड करतील त्याच मंडळांना त्वारिता पुरी विद्यालयाच्या वतीने प्रमाणात पत्र व ट्रॉफी देऊन मंडळाचा गौरव करण्यात येणार असल्याचे अँड सुरेश हात्ते यांनी जाहीर केले तसेच आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ ओमप्रकाश शेटे साहेब यांचा १५ ऑगस्ट रोजी वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त सन्मानचिन्ह ट्रॉफी देऊन गणेश मंडळाचा गुणगौरव करण्यात येणार असल्याचे डॉ ओमप्रकाश शेटे यांचे विश्वासू पत्रकार आल्ताफ कुरेशी यांनी तलवाडा पोलीस स्टेशन येथील शांतता समितीच्या गणेश उत्सव बैठकीत जाहीर केले आहे.

### संत सेवालाल महाराज

ना.चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख रामेश्वरभाऊ नाईक यांचे निकटवर्तीय म्हणून अँड.पंडितभाऊ राठोड परिचीत आहेत. संपूर्ण मराठवाड्यात तांडा,वाडी,वस्ती संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. तांड्यावरील समस्या व अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी करण्यासाठी शासनदरबारी प्रयत्न करणार आहेत. उमदा,त्यागी,समर्पित व कर्तव्यदक्ष युवा नेता म्हणून तळागाळातील बंजारा समाज अँड.पंडित भाऊ राठोड यांच्याकडे अत्यंत अपेक्षेने पाहत आहे. अँड.पंडितभाऊ यांच्या निवडीबद्दल राज्यातील बंजारा समाजाकडून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.अँड.पंडितभाऊ राठोड यांच्या निवडीबद्दल संघर्षशिल नेते प्रा.पी.टी.चव्हाण,भिकणभाऊ जाधव,मधुकर जाठोत, अमोलभाऊ पवार,विकास जाधव,विलास राठोड,गणपती राठोड,प्रकाश राठोड,भगवान राठोड,पवन जाधव,एकनाथ आडे,सत्यम पवार यांनी अभिनंदन केले आहे.

### चौसाळा येथील हरिनाम

दररोज सुरू आहे सदर आयोजित केलेल्या पारायण कार्यक्रम ह भ प ज्ञानेश्वर महाराज साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे या हरिनाम सप्ताहाची सांगता दिनांक १६ / ०८/२०२५ रोजी ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती पंढरपूर यांच्या काल्याच्या कीर्तनाने केली जाणार आहे तरी सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान चौसाळा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अॅड.राज पाटील यांना वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान

**वडवणी प्रतिनिधी**

**लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अँड राज पाटील यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल वीर छत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार व अजिंक्यतारा २०२५ चा पुरस्कार अहिल्यानगर येथे रविवार दि १० ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आल्याने त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनचा वर्षाव होत आहे.**

वडवणी तालुक्यातील तिगावचे विद्यमान सरपंच तथा सरपंच परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष अँड राज पाटील यांनी लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून निसर्गसंवर्धन, जलसंधारण, शेती रस्ते, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, तसेच कोरोना काळात गरजूंना अन्नधान्य व आरोग्यविषयक साहित्य पुरविण्याचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांनी आजपर्यंत हजारो वृक्षांचे वाटप केले असून, समाजात रक्तदानासह अवयव दान व मरणोत्तर





### सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव

देहदान जनजागृती सोबत, स्वतः ५० वेळा रक्तदान केले आहे, २७ वेळा रक्तदान शिबिर आयोजन व अवयव दान, मरणोत्तर देहदान फॉर्म भरला आहे. गावचे सरपंच म्हणून कार्य करताना त्यांनी सरपंच परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून शेकडो सरपंचांच्या समस्या मांडून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांसाठी, शेती रस्ते व जलसंधारणाच्या माध्यमातून मोठे काम उभे केले आहे. तसेच मराठा आरक्षणाच्या लढ्यातही गेल्या दहा वर्षांपासून त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. त्यांच्या या कार्याची दखल अहिल्यानगर येथील अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था महाराष्ट्र या संस्थेने घेतली. वीर शिव छत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार व अजिंक्यतारा २०२५ चा पुरस्कार नगर सेवक डॉ. सागर बोरुडे,रिल स्टार शिवानी बनकर ॲक्टर सचिन चव्हाण, ॲक्टर अर्जुन अंबेकर, सस्थेचे अध्यक्ष तुषार बोरुडे, अँकर सिमा डुकरे यांच्या हस्ते देण्यात आला. त्यांच्यावर सर्व स्तरांमधून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

**मित्रपरिवार आणि पत्रकार मंडळींचे सहकार्य**

कोणतेही समाजकार्य तन मन धनाने केले तर मानसिक समाधान मिळते. गोर गरीबांना व गरजवंतांना मदत करणे, झाडे लावणे, गोर गरीब शेतकऱ्यांच्या मुला मुलींना शालेय साहित्य देणे, जो गरजु माझ्याकडे मदत मागायला आला तो कधीच खाली हाताने जाऊ देत नाही. त्यांच्या समस्या सोडविणे व त्यांना मदत करण्यात मला अनंद मिळतो. त्यांच्या आशिर्वादाने गावकऱ्यांच्या सहकार्याने , मित्र परीवार आणि वडवणी तालुक्यातील तसेच बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकारांचे मार्गदर्शन आणि सहकार्य कायम मिळत असते. आमच्या लढा दुष्काळाशी टीमच्या कामाची दखल घेत महाराष्ट्रातून अनेक सन्मान व पुरस्कार मिळत असल्याचे लढा दुष्काळाशी फौडेशनचे अध्यक्ष ॲड.राज पाटील यांनी म्हटले आहे.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-२३४ दिनांक-०८/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती लहु रामभाऊ राठोड रा. दुधपुरी तांडा ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म/मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | युवराज लहु राठोड | मुलगा | ०८/०९/२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-०८-८-२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-२३७ दिनांक-१२/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती मच्छिंद्र जगन चव्हाण रा. पिठोरी सिरसगाव ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म/मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मच्छिंद्र जगन चव्हाण | स्वत: | ०४/०५/१९९३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-१२-८-२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-३९८ दिनांक-

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती गजानन वाल्मिक कानडे रा.लालवाडी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गजानन वाल्मिक कानडे | स्वत: | ०२/०३/१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-१७३ दिनांक-२८/०७/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती करण तुकाराम मिठे रा. बारसवाडा ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | करण तुकाराम मिठे | स्वत: | ०३/१०/२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २८/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# पाणंद शेतरस्ते आता कायमस्वरूपी रेकॉर्डवर येणार

## भुमी अभिलेख विभागाने घेतला हा निर्णय

पुणे : जिल्ह्यात गावागावांमधील बंद झालेले पाणंद, शिवरस्ते मोकळे करण्याची मोहीम कायमच सुरू असते. तेच ते रस्ते खुले करून तहसीलदारही आपली पाठ थोपाटून घेतात. ही एक साखळी असून यापुढे खुले झालेले पाणंद रस्ते कायमचे खुले राहावेत यासाठी त्या रस्त्याला उपग्रह नकाशा आणि कोऑर्डिनेट लावून स्वामीत्व योजनेत त्याचा नकाशाच तयार करण्यात येणार आहे.

शिरूर तालुक्यातील १० गावांमध्ये ही मोहीम प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहेत. याला नकाशाची जोड असल्याने यावर हरकती आल्या,तरीही दोन सुनावणींमध्ये त्यात निकाल देण्यात येईल. त्यामुळे रस्ते कायमस्वरुपी खुले राहतील, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. हा प्रयोग सुरुवातीला पुणे त्यानंतर राज्य आणि सबंध देशभर राबविला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मालमत्ता आणि पाणंद रस्त्यांवरून आजही गावागावांमध्ये वाद झडत असतात. त्यामुळे जिल्ह्यात पाणंद रस्ते मोकळे करण्याची मोहिम पुन्हा हाती घेण्यात आली आहे. आतापर्यंत सुमारे ९०० किलोमीटरचे रस्ते मोकळे केल्याचा फायदा



जिल्ह्यातील सुमारे ३५ हजार करणे आणि त्यानंतर ते पुन्हा बंद होणे ही एक साखळी असून तहसीलदार प्रांताधिकारी रस्ते खुले करण्याचा केवळ दावा करतात. प्रत्यक्षात जमिनीवरील स्थितीत विशेष फरक पडत नाही. त्यामुळे हे रस्ते कायमस्वरुपी खुले राहावेत यासाठी या रस्त्यांना नकाशे जोडण्याचा अभिनव राबविण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने स्वामीत्व योजनेतून सर्वच

### मोजणीची गरज नाही...

भुमी अभिलेख विभागाने अशा रस्त्यांची नोंद आता गाव नकाशातही घेण्याचे ठरविले आहे. कॉऑर्डिनेट असल्याने या रस्त्यांच्या मोजणीची गरज भासणार नाही. त्यामुळे हे रस्ते कायमस्वरूपी रेकॉर्डवर येतील. याची नोंद झाल्यानंतर त्यावर हरकत आल्यास नकाशा असल्याने मामलेदार न्यायालयातही केवळ एक ते दोन सुनावणीत त्याचा निकाल देणे शक्य होणार आहे.

मालमत्तांचे नकाशे तयार करून मिळकत पत्रिका तयार करण्याचे काम सुरू केले आहे. त्याच धर्तीवर आता पाणंद रस्त्यांची पत्रिका अर्थात नकाशा तयार करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले. यासाठी रस्त्यांना जीआयएसची मदत घेऊन कोऑर्डिनेट जोडून त्याला महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्राकडून (एमआरसॅक) मिळालेला नकाशा जोडण्यात येणार आहे. त्यामुळे या रस्त्याची पक्की पत्रिका तयार होईल.

# भुईमूग पिवळा पडण्याची समस्या व उपाययोजना



भुईमूग पिकात पिवळेपणा दिसू लागल्यास तो अनेक कारणांमुळे होऊ शकतो. विशेषतः जर पाऊस सतत होत असेल आणि जमीन चुनखडी (कॅल्सियमयुक्त) असेल, तर पिकाच्या आरोग्यावर त्याचा थेट परिणाम होतो.

समस्या ओळख :पाने पिवळी होणे ही लक्षणे प्रामुख्याने सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे (विशेषतः लोह, मॅग्नेशियम, मोलिब्डेनम दिसून येतात. पाऊस आणि चुनखडी जमिन असल्यास सततच्या पावसामुळे मुळांना ऑक्सिजन मिळत नाही.चुनखडी जमिनीत जास्त असल्याने लोह व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये शोषली जात नाहीत. मुळांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो.सूक्ष्म अन्नद्रव्ये फवारणी :पाने पिवळी पडल्यास खालील मिश्रणाचा फवारणीद्वारे उपयोग करा.स्प्रे मिश्रण – फेरस सल्फेट ०.५% (५०० ग्रॅम/१०० लिटर पाणी).सायट्रिक ॲसिड ५० ग्रॅम/१०० लिटर पाणी. युरिया १% (१ किलो/१०० लिटर पाणी) (वाढीला चालना देण्यासाठी) हे मिश्रण ७–१० दिवसांच्या अंतराने २ वेळा फवारावे.पाणी निचरा सुधारणा :सततचा पाऊस असल्यामुळे जमिनीत पाणी साचत असल्यास, पिकामध्ये पाणी साचणार नाही याची दक्षता घ्या. नाली पद्धतीने पाणी वाहून नेण्याची सोय करावी.जमिनीचा पीएच नियंत्रित करणे :जमिनीचा पीएच ७.५ पेक्षा जास्त असल्यास सूक्ष्म अन्नद्रव्ये शोषले जात नाहीत. अशावेळी सेंद्रिय घटक (जसे कंपोस्ट, गांडूळ खत) टाकल्यास जमिनीचा पीएच काही प्रमाणात संतुलित होतो. झिंक, फेरस आणि मॅग्नेशियमसारखी सूक्ष्म अन्नद्रव्ये पाने फवारणीने द्यावीत. जमिनीची तपासणी :एकदा मृदा परीक्षण करून घ्या. त्यामुळे नेमकी कोणती अन्नद्रव्ये कमी आहेत हे समजेल.जैविक उपाय :रायझोबियम व पीएसबी कल्चर यांचे बीजप्रक्रिया केल्यास मुळांच्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो. ट्रायकोडर्मा + जीवामृत/जिवाणू खते वापरल्यास मुळांची वाढ सुधारते.

# पपई लागवडीसाठी या तीन जाती ठरतील उपयुक्त

आपण एकंदरीत भारताचा विचार केला तर पपईची लागवड आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल व बिहार इत्यादी राज्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर होते. आणि फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्र मध्ये नाशिक, अहमदनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, अमरावती, पुणे, सातारा, जालना, सोलापूर या व इतर अनेक जिल्ह्यांमध्ये पपईची लागवड केली जाते.

पपईच्या भरघोस उत्पादन देणाऱ्या जाती :

पुसा डेलिशियस – या जातीचे पपईचे झाड जास्तीत जास्त सात ते साडेसात फूट उंच वाढते व लागवडीपासून ८ महिन्यात फळे लागतात. या जातीच्या एका झाडावर नर आणि मादी असे दोन्ही प्रकारचे फुले असतात. या जातीचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या जातीला जमिनीपासून अवघ्या अडीच ते पावणेतीन फुटांवर फळे लागायला सुरुवात होते. या जातीच्या फळांची प्रत उत्कृष्ट असल्यामुळे बाजारपेठेत भाव देखील चांगले मिळतात. या जातीच्या फळांचा आतील गर नारिंगी असतो व चव व स्वाद उत्तम असतो. फळांचा आकार मध्यम व मोठा तसेच गोलाकार लांबोळी असतात. एका फळाचे वजन एक ते दोन किलोपर्यंत भरते.

पुसा मॅजेस्टी – या जातीचे झाडे सहा ते साडे सहा फूटपर्यंत वाढते. या जातीच्या रोपांची लागवड केल्यापासून पाच महिन्यात जमिनीपासून दीड फूटावरून फळधारणा व्हायला सुरुवात होते. या जातीची फळे मध्यम, आकाराने गोलाकार तसेच गर हा घट्ट पिवळसर असतो. साडेतीन सेंटीमीटर जाडीचा गर या जातीच्या फळाचा असून फळे एक किलो पासून तीन किलो पर्यंत असतात. या जातीच्या फळांमध्ये टिकाऊपणा जास्त असल्यामुळे साठवणुकीत फळे खराब होण्याचे प्रमाण नगण्य असते.

पुसा जायंन्ट – या जातीच्या पपईचे झाडे सात ते साडेसात फूट उंच वाढते व लागवड केल्यापासून साडेआठ महिन्यानंतर जमिनीपासून तीन फुटांवर फळे लागायला सुरुवात होतात. या जातीच्या पपईच्या झाडाचे खोड मजबूत असल्यामुळे वाऱ्यामध्ये झाड पडत नाही. या जातीची फळे आकर्षक व मोठी असतात तसेच एका फळाचे वजन सव्वा ते तीन किलो वजना पर्यंत भरते. या जातीच्या फळांचा उपयोग भाजी व फॅनिंगसाठी केला जातो.या जातीच्या फळांचा गर नारिंगी रंगाचा असतो व जाडी ५ सेंटिमीटर असते.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६० : मुघल फौजांनी संग्रामगड (चाकणचा किल्ला) ताब्यात घेतला.
१८६२ : कलकत्ता उच्च न्यायालयाची स्थापना
१८६२ : मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना
१८९३ : मोटर वाहनांची नोंदणी सुरू करणारा फ्रान्स हा पहिला देश बनला.
१९४३ : नागपूर विद्यापीठाने स्वातंत्र्यवीर सावरकर यांना सन्माननीय डी. लिट. पदवी दिली.
१९४५ : दोन अणुबाँबच्या भयावर संहारामुळे जपानने शरणागती पत्करली आणि दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला.
१९४७ : भारताच्या घटनासमितीने सत्ता स्वीकारण्याचा ठराव मंजूर केला आणि लॉर्ड माऊंटबॅटन यांची स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक केली.
१९४७ : पाकिस्तानला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९५८ : 'एअर इंडिया'ची दिल्ली मॉस्को विमानसेवा सुरू झाली.
१९७१ : बहारीनला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
२००६ : श्रीलंकेच्या वायुदलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात चेन्चोलाई येथे ६१ तामिळ मुली ठार झाल्या.
२०१० : पहिल्या 'युवा ऑलिम्पिक स्पर्धा' सिंगापूरमधे घेण्यात आल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७७ : हान्स क्रिस्टियन ओरस्टेड डॅनिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ९ मार्च १८५१)
१९०० : महाराष्ट्रीयन ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी,पत्रकार, अभ्यासक आणि वक्ते एस. के. पाटील यांचा जन्मदिन.
१९०७ : गोदावरी परुळेकर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या, सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका. महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री वकील म्हणून त्यांनी सनद मिळवली. तलासरी, डहाणू, शिरगाव या भागातील डोंगरदर्यांत फिरून वारल्यांच्या पिळवणुकीचे अनुभव त्यांनी ऐकले व आदिवासींमधे जागृतीचे कार्य केले. 'जेव्हा माणूस जागा होतो' हे त्यांचे पुस्तक वेगळ्या जगाची ओळख करुन देणारे आहे. (मृत्यू: ८ आक्टोबर १९९६)
१९११ : वेदतिरी महाऋषी भारतीय तत्त्वज्ञानी (मृत्यू:)
१९२३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय पत्रकार, सिंडिकेटेड स्तंभलेखक, मानवाधिकार कार्यकर्ते, लेखक आणि युनायटेड किंगडमचे माजी उच्चायुक्त कुलदीप नायर यांचा जन्मदिन.
१९२५ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (मृत्यू: १६ सप्टेंबर १९९४)
१९५७ : जॉन प्रकाश राव जनुमला ऊर्फ 'जॉनी लीवर' विनोदी अभिनेता
१९६२ : रमीझ राजा पाकिस्तानी क्रिकेटपटू व समालोचक
१९६८ : प्रवीण आम्रे क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५८ : जीन फ्रेडरिक जोलिओट मूलद्रव्याच्या समस्थानिकांच्या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक (१९३५) मिळवणारा फ्रेन्च पदार्थवैज्ञानिक (जन्म: १९ मार्च १९००)
१९८४ : कुस्तीगीर खाशाबा दादासाहेब जाधव १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमधे वैयक्तिक पदक मिळवणारे पहिले भारतीय, शिवछत्रपती पुरस्कार मरणोत्तर (जन्म: १५ जानेवारी १९२६)
१९८८ : एन्झो फेरारी रेस कार निर्माते आणि ड्रायव्हर (जन्म: १८ फेब्रुवारी १८९८)
२०११ : शम्मी कपूर हिन्दी चित्रपट अभिनेता व निर्माता (जन्म: २१ आक्टोबर १९३१)
२०१२ : विलासराव देशमुख महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्री (जन्म: २६ मे १९४५)
२०१७ : प्रसिद्ध भारतीय कवी व साहित्यकार चंद्रकांत देवताले यांचे निधन.

# कार्बन शेती हमखास फायदेशीर

कार्बन शेतीचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होतात. वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषला जातो आणि तो मातीमध्ये सेंद्रिय कार्बनच्या रूपात साठवला जातो. कार्बन डायऑक्साइड हा एक प्रमुख हरितगृह वायू आहे, जो जागतिक तापमानवाढीस कारणीभूत ठरतो.

हरितगृह वायू उत्सर्जन कमी :कमी नांगरट, रासायनिक खतांचा कमी वापर आणि पिकांचे अवशेष जमिनीत मिसळणे यांसारख्या पद्धतीमुळे शेतीमधून होणारे नायट्रस ऑक्साइड आणि मिथेन यांसारख्या इतर हरितगृह वायूंचे उत्सर्जनही कमी होते.

जैवविविधता वाढवणे :सेंद्रिय पदार्थांच्या प्रमाणात आणि जमिनीची रचना सुधारल्याने मातीतील सूक्ष्मजीव, कीटक आणि इतर लहान जीवांची संख्या वाढते. कृषीवनीकरण पद्धतीमुळे पक्षी आणि इतर वन्यजीवांसाठी अधिवास निर्माण होतो.

पाणी गुणवत्ता सुधारणा :जमिनीची धूप कमी झाल्यामुळे आणि रासायनिक खतांचा वापर टाळल्यामुळे पाणी प्रदूषित होण्याचे प्रमाण कमी होते. मातीतील सेंद्रिय पदार्थ पाणी स्वच्छ ठेवण्यास मदत करतात, ज्यामुळे नद्या, तलाव आणि भूजलाची गुणवत्ता सुधारते.

जमिनीसाठी फायदे :जमीन सुपीकता वाढ : सेंद्रिय कार्बन जमिनीसाठी एक महत्त्वाचे पोषणद्रव्य आहे. यामुळे जमिनीची नैसर्गिक सुपीकता वाढते.




आवश्यक अन्नद्रव्ये सहज उपलब्ध होतात.

जलधारण क्षमता वाढ :सेंद्रिय पदार्थ मातीची रचना सुधारतात, ज्यामुळे मातीमध्ये पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. दुष्काळासारख्या परिस्थितीतही पिकांना अधिक काळ पाणी उपलब्ध राहते.

माती रचना सुधारणा :सेंद्रिय कार्बनमुळे मातीच्या कणांचे एकत्रीकरण होते, ज्यामुळे मातीची रचना भुसभुशीत होते. हवा खेळती राहते, मुळांना वाढण्यासाठी चांगली जागा मिळते, पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होतो.

धूप नियंत्रण :कमी नांगरट आणि आच्छादन पिके वापरल्याने माती उघडी राहत नाही. यामुळे पाणी आणि वाऱ्यामुळे होणारी मातीची धूप मोठ्या प्रमाणात कमी होते, ज्यामुळे जमिनीचा सुपीक थर टिकून राहतो.

सूक्ष्मजीवांना प्रोत्साहन :सेंद्रिय कार्बन मातीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांसाठी अन्न आणि योग्य वातावरण पुरवतो. हे सूक्ष्मजीव मातीतील पोषणद्रव्यांचे चक्र पूर्ण करण्यास मदत करतात, ज्यामुळे जमिनीचे आरोग्य सुधारते.रासायनिक खतांचा कमी वापर :जमिनीची नैसर्गिक सुपीकता वाढते. नत्र स्थिरीकरणामुळे रासायनिक खतांचा वापर कमी होतो.उत्पन्नात वाढ :सुपीक जमीन, योग्य जल व्यवस्थापन आणि रोगांचा कमी प्रादुर्भाव यामुळे पिकांचे उत्पादन वाढते. कार्बनचे प्रमाण वाढल्यास पिकांची गुणवत्ताही सुधारते.

खर्चात बचत :रासायनिक खते, कीटकनाशके आणि सिंचनासाठी लागणारे पाणी यांचा वापर कमी झाल्यामुळे उत्पादन खर्च घटतो. कमी नांगरटीमुळे इंधनाची बचत होते.

कार्बन क्रेडिट्सपासून उत्पन्न :आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्बन क्रेडिट मार्केट विकसित होत आहेत. जे शेतकरी आपल्या शेतीत कार्बन साठवणूक करतात, त्यांना या कार्बन साठवणुकीसाठी 'कार्बन क्रेडिट्स' मिळतात. हे क्रेडिट्स ज्या कंपन्यांना त्यांच्या कार्बन उत्सर्जनाची भरपाई करायची असते, त्यांना विकून अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकतात.

जोखीम व्यवस्थापन : कार्बन शेतीच्या पद्धतीमुळे जमीन अधिक लवचिक बनते, हवामान बदलाच्या परिणामांना (उदा. दुष्काळ, अतिवृष्टी) अधिक प्रभावीपणे सामोरे जाऊ शकते. जमिनीचे आरोग्य सुधारल्याने पुढील पिढ्यांसाठीही जमीन उत्पादनक्षम राहते. उत्तम मातीचे आरोग्य आणि कार्यक्षम पाणी वापरामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीची उत्पादकता दिर्घकाळ टिकते.

# राज्यात नऊ हजार पशुधनांना 'लम्पी'

'लम्पी स्कीन'मुळे राज्यातील ९ हजार ८२० पशुधन बाधित असून, ६ हजार ६१८ जनावरे उपचारानंतर बरी झाली आहेत. तर आतापर्यंत ३३९ जनावरांचा मृत्यू झाला आहे.राज्यात ९३ टक्क्यांपेक्षा जास्त गोवंशीय पशुधनांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. राज्यातील एकूण गोवंशीय पशुधनांच्या तुलनेत लम्पी स्कीनचा प्रादुर्भाव अत्यल्प आहे. अशी माहिती पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी दिली आहे.

''प्रादुर्भावग्रस्त भागांत उपचार, कीटक नियंत्रण व जनजागृती मोहीम सुरू आहे. पशुपालकांनी घाबरून न जाता जनावरांचे लसीकरण करून घ्यावे, तसेच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनांचे पालन करावे,'' असे आवाहन डॉ. रामास्वामी एन. यांनी केले आहे. शासनामार्फत तत्काळ व प्रभावी नियंत्रण योजना राबविल्या जात आहेत, असेही त्यांनी सांगितले. केंद्र शासनाकडील मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात गोट पॉक्सची



विजातीय उत्तरकाशी स्ट्रेन लस दिली जात आहे. त्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव कमी झाला आहे. लम्पी स्कीन प्रतिबंधात्मक सजातीय लस वापरली गेली तर रोग नियंत्रणाकरिता अधिक परिणामकारक होईल. त्यामुळे या पुढील काळात नियंत्रण आणण्यासाठी लम्पी स्कीन आजार प्रतिबंधात्मक लस निर्मितीचे तंत्रज्ञान भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली यांच्या ॲग्रीइन्नोवेट इंडिया या कंपनीकडून उपलब्ध करून घेतले. त्यामुळे पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे या पशुसंवर्धन विभागाच्या राज्यस्तरीय संस्थेमध्ये व्यावसायिक तत्त्वावर लसनिर्मिती लवकरच करण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात राज्यातील १०० टक्के गोवर्गीय पशुधनास दरवर्षी प्रतिबंधात्मक लसीकरण करणे शक्य होणार आहे.

# राष्ट्रहितासाठी स्वदेशी वस्तुंना प्राधान्य द्या;व्यापाऱ्यांनी विदेशी मालाची खरेदी-विक्री करु नये - हस्तीमल बंब

जालना। प्रतिनिधी

व्यापारी महासंघ जिल्हा जालना (कॅट) च्या महिला-पुरुष पदाधिकाऱ्यांची महत्वपुर्ण बैठक मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या अध्यक्षते खाली दि. ११ अगस्त २०२५ रोजी हॉटेल मधुबन च्या सभागृहात घेण्यात आली. त्यावेळी श्री बंब बोलतांना म्हणाले नुकतेच अमेरिकाचे राष्ट्रीय अध्यक्ष ट्रम्प यांनी तेथुन भारतात येणाऱ्या वस्तुंवर ५०% टॅरीफ कर लादले आहे व सुडबुध्दीने आपल्या देशाबद्दल बोलत आहे. मागील अनेक वर्षापासुन चीन देशा मधुन टिकाऊ नसताना ही फक्त देखावा पुरता अनेक प्रकारचे माल भरपुर आपल्या देशात येत आहे या मुळे स्वदेशी मालाच्या विक्रीवर भयंकर परिणाम होत आहे. आपल्या देशाचा पैशा - विदेशात जात आहे, त्यामुळे आर्थिक दृष्ट्या ने देशावर विपरित परिणाम होत आहे.



अमेरिकेचे ॲमेझॉन ॲप ला त्याग केल्यास आपण अमेरिकाला आपल्या देशाची ताकत दाखवु शकतो. म्हणून राष्ट्र हितासाठी स्वदेशी वस्तुना प्राधान्य द्या, व्यापाऱ्यांनी विदेशी मालाची खरेदी-विक्री करु नये असे बंब म्हणाले. बंब सोबत राज्य उपाध्यक्ष सतीष पंच मराठवाडा विभागीय सचिव सुखदेव बजाज, जिल्हा उपाध्यक्ष अंकुश राऊत, महिला आघाडीची अध्यक्षा सौ. सिता मोहिते पाटील मंचावर उपस्थित होते. पुढे बोलताना बंब म्हणाले नुकतेच कॅट व्यापारी संघटनाचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया, राष्ट्रीय महामंत्री व दिल्ली चांदनी चौक चे नवनिर्वाचित खासदार प्रविण खंडेलवाल यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक दिल्ली येथील संसद भवनात देशाचे लोकसभा अध्यक्ष, पंतप्रधान, गृहमंत्री, अर्थमंत्री इ. यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. संसद भवनात व्यापाऱ्यांची बैठक हा देशाच्या इतिहासात प्रथमच आहे, तसेच मागील हप्त्यात दिल्लीच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्री सौ. गुप्ता यांच्या सोबत सुध्दा उद्योजक व्यापाऱ्यांची बैठक घेण्यात आली होती. विशेष करून पंतप्रधानानी राष्ट्रहितासाठी स्वदेशी माललाच प्राधन्य द्या असे व्यापाऱ्यांना अहवान केले. त्या अनुषंगाने संपुर्ण देशात कॅट व्यापारी संघटना तर्फे हा अभियान राबविण्यात येत आहे. संपुर्ण मराठवाड्यात संपर्क दौरा, बैठका घेऊन प्रत्येक जिल्ह्यात स्वदेशी वर भर देऊन विदेशी मालावर बंदी आणण्यासाठी जन-जागरण करु, प्रत्येक प्रतिष्ठानावर फलक व शहरात गावात होर्डींग बोर्डे लावून प्रचार-प्रसार करु असे बंब म्हणाले. श्री पंच मार्गदर्शन करताना कुटुंब, समाज व्यवसाय उद्योगात सर्वात प्रथम राष्ट्र आहे, आपला देश जगात तिसरी महासत्ता होत आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. आपल्या सहकार्याने देश जगात प्रथम क्रमांक आणण्यासाठी सर्व व्यापाऱ्यांनी आत्मनिर्भर भारतासाठी विदेशी मालाच्या बहिष्कार करणे गरजेचे आहे, असे पंच म्हणाले. महिला आघाडीची अध्यक्षा सौ. मोहिते म्हणाल्या आपण सर्वांनी विदेशी मालाची खरेदी-विक्री करु नये, त्यासाठी व्यापाऱ्यांने प्रतिज्ञा व शपथ घेतली पाहिजे. या अभियानात महिला आघाडी देशाच्या हितासाठी कुठे ही कमी पडणार नाही. श्री राऊत, श्री बजाज, सौ. आनंदी अय्यर, सौ. प्रिया जोशी यांनी आपले विचार मांडले. श्री अतुल लड्ढा बोलताना घर - घर तिरंगा, हर दुकान तिरंगा अभियान प्रारंभ करण्याचे सुचविले. या बैठकीसाठी संदीप काबरा, शिवजी तनपुरे, रामभाऊ मोहिते, प्रमोद जोशी, ॲड. सुब्रह्मणयम अय्यर, अनिकेत अय्यर, श्री गाजरे आदिनी परिश्रम घेतले, बैठकीचे सुत्र संचालन डिजिटल अभियानाचे प्रमुख मकरंद शहापुरकर यांनी केले, तर आभार सचिव प्रविण मोहता यांनी मांडले.



## सादोळा येथील लोणी-सावंगी उपसा जलसिंचन योजना तेरा वर्षांपासून अर्धवट अवस्थेत

### १५ ऑगस्टला पालकमंत्री अजित पवार यांची गाडी अडवून निवेदन देणार : भाई थावरे

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील सादोळा येथील लोणी-सावंगी गोदावरी पात्रातून २०१२ मध्ये सुरू झालेली उपसा जलसिंचन योजना आजही अवर्धट अवस्थेतच आहे. तेरा वर्षांच्या प्रतीक्षेनंतरही एकही थेंब पाणी माजलगाव धरणापर्यंत पोहोचले नाही.हे काम वेळेत पूर्ण झाले असते,तर आज माजलगाव धरणात गोदावरीचे पाणी झऱ्यासारखे आले असते.या प्रकरणी १५ ऑगस्टला पालकमंत्री अजित पवार यांची गाडी अडवून निवेदन देणार असल्याचे शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी सांगितले.

भाई थावरे म्हणाले की,सध्याच्या घडीला माजलगाव धरणातील पाणीसाठा चिंताजनकरीत्या कमी झाला आहे.परंतु लोणी-सावंगी उपसा जलसिंचन योजना पूर्ण झाली असती तर गोदावरी नदीचे पाणी माजलगाव धरणात सोडता आले असते आणी आज वेगळे चित्र समोर दिसले असते.मात्र तालुक्याला सुजलाम सुफलाम करणारी योजना तेरा वर्षांपासून अर्धवट अवस्थेत आहेत.याला प्रशासनाचा हजगर्जीपणा जबाबदार की लोकप्रतिनिधींची हलगर्जीवृत्ती,असा प्रश्न संतप्त शेतकरी विचारत आहेत.या प्रश्नावर तातडीने तोडगा निघावा म्हणून शेतकरी संघर्ष समितीचे नेते भाई गंगाभिषण थावरे यांच्या नेतृत्वाखाली दि १५ ऑगस्ट रोजी स्वतंत्र दिनी उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांना 'गाडी अडवा'आंदोलन करून निवेदन देण्यात येणार आहे. तसेच शेतकरी संघर्ष समितीने असा ही इशारा दिला आहे की,लोणी-सावंगी उपसा जलसिंचन योजना पूर्ण न झाल्यास पुढील काळात व्यापक आंदोलन पेटवले जाईल.

## जिल्हा परिषदेच्या १६ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना कनिष्ठ सहाय्यक लिपिकपदी पदोन्नती



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या चतुर्थ श्रेणी गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना दोन नदीचे आदेश बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी ५ ऑगस्ट २०२५ रोजी दिले आहेत. कर्मचाऱ्यांच्या अनेक दिवसापासून पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. सदर पदोन्नती देण्यात आल्यामुळे कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्याचे ऋण व्यक्त करून आनंद व्यक्त केला आहे. दरम्यान जिल्हा परिषदेचे सीईओ रहमान यांनी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती, बदली, आणि विविध प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक काम सुरू असल्याचे दिसून आले आहे.

जिल्हा परिषदेच्या पदोन्नती निवड समितीने पात्र १६ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली आहे. खालील कर्मचाऱ्यांना पदोन्नती घेऊन पदस्थापना पुढील प्रमाणे दिली आहे. १) होनराव संजू शिवलिंग आप्पा- शिक्षण विभाग, जि. प. बीड, २) बोबडे दत्तात्रय लक्ष्मण - आरोग्य विभाग, जि. प., बीड ३) गुजर श्रीकृष्ण जालिंदर - प्राथमिक आरोग्य केंद्र, विडा ४) गुंड बन्सी देविदास- प्राथमिक आरोग्य केंद्र धर्मापुरी ५) श्रीमती जाधव सुरेखा रामदास- नवगण राजुरी ६) श्रीमती चांभारे सीमा विष्णू- पंचायत समिती, माजलगाव ७) रंगदळ शरद माणिक- मा.शा. पात्रुड ८) श्रीमती सोनवणे सुनिता राजू - बांधकाम विभाग क्र.२ ९) श्रीमती चाटे उषा महादेव - पंचायत समिती, केज १०) श्रीमती धुमाळ आशाबाई सिताराम- पंचायत समिती, परळी ११) कांबळे रामेश्वर श्रीपती - प्रा. आरोग्य केंद्र, पात्रुड १२) पाटील लक्ष्मीकांत पुरुषोत्तम - गटशिक्षणाधिकारी पं.स. माजलगाव १३) जोशी संतोष हरिभाऊ- प्रा. आरोग्य केंद्र, आपेगाव१४) पुजारी रंजिता निवृत्तीराव- पं.स. परळी १५) जाधव गजानन देविदास - बालविकास प्रकल्प अधिकारी गेवराई १६) रोकडे महेश बाबुराव- शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या अध्यक्षतेखाली प्रदीप काकडे, उपमुख्य अधिकारी सामान्य प्रशासन प्रदीप काकडे, श्रीमती मेश्राम, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, आणि लेखा व वित्त अधिकारी जि. प. बीड यांच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीस मान्यता दिली. सदर पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहाय्यक प्रशासन अधिकारी नवले, कनिष्ठ प्रशासन अधिकारी संतोष गायकवाड, वरिष्ठ सहाय्यक श्रीमती स्वाती आम्ले यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महिला व्यावसायिकामुळे एखाद्या शहराचे नाहीतर देशाचे अर्थचक्र गतिमान झाले-जयश्री विधाते

बीड। प्रतिनिधी

अंकिता गणेश राऊत यांच्या लक्स ब्युटीपार्लर, ग्राउंड फ्लोअर, ऑलिव्ह हॉटेल, नगर नाका बीड. चे उद्धाटन मा. सभापती तथा नगरसेविका सौ. जयश्रीताई विलास विधाते यांच्या शुभहस्ते तर प्रमुख पाहुणे म्हणून स्नेहा ब्युटीपार्लर-मेकअप आर्टिस्ट ट्रेनिंग सेंटरच्या संचालिका सौ. मनिषाताई मुंडे, मेकअप आर्टिस्ट सौ. मोनिकाताई छाजेड (संचेती) यांच्या उपस्थितीत फीत कापुन श्रीफळ वाढवून झाले. अतिथी देव भव या उक्ती प्रमाणे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला अंकीता राऊत यांनी उपस्थितांचे स्वागत करत प्रशिक्षणापासुन व्यासायाच्या उद्धाटन दिनापर्यंत सासर- माहेरची मंडळी गुरु आणि स्नेहीजनांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद मानले आणि उपस्थितांचे आभार व्यक्त केले. तर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मनिषाताई मुंडे यांनी गुरु या नात्यांने तिच्या प्रशिक्षण काळातील आठवणींना उजाळा देत. ती तिच्या जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उत्तम व्यावसायिक म्हणून नावारूपास येईल असा आशावाद व्यक्त शुभेच्छा दिला. कार्यक्रमाच्या उद्धाटीका विधातेताईंनी आज महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत. सरकारी निमसरकारी नोकऱ्यांन बरोबरच उत्तम व्यावसायिक आणि उद्योजक म्हणून सिध्द होत आहेत.

ज्याप्रमाणे मेडिकल क्षेत्रात हॉस्पिटल, मेडिकल, सोनोग्राफी, पॅथॉलॉजि, फिजिओथेरपिस्ट यांची साखळी असते तशीच ब्युटीपार्लर, मेकअप आर्टिस्ट, ब्युटी प्रोडक्ट एजन्सी, मेहंदी आर्टिस्ट, साडी सेंटर, ड्रेसेस, ज्वेलर्स, फोटोग्राफी यांचीही साखळी तयार होत आहे.

अशा ब्युटीपार्लरच्याभोवती अनेक व्यावसायिकांचे अर्थचक फिरते तेंव्हा महिला व्यावसायिक आपल्या कुटुंबाची अर्थिक बाजु सांभाळत आपल्या शहराचे जिल्हयाचे राज्याचेच नाहीतर देशाचे अर्थचक्र गतीमान करण्यास हातभार लावत आहेत असे मत व्यक्त केले. मेकअप आर्टिस्ट आणि तिच्या प्रशिक्षणातील गुरु मोनिकाताईं यांनी बाळाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणी प्रमाणे तीच्या प्रशिक्षण काळातच ती यशस्वी होणार याची मला खात्री असे नमुद केले. उपस्थितांचे सौ. संजीवनीताई राऊत यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला ज्योतीताई भोपळे, साखरेताई, शिंदेताई आणि यांच्यासह अनेक आप्तेष्ट हितचिंतक आणि परिसरातील महिला भगीनी उपस्थितहोत्या.

## कैलास तांगडे यांची पंचायत विभागात कनिष्ठ प्रशासनाधिकारी पदी नियुक्ती

बीड। प्रतिनिधी



बीड जिल्हा परिषदेचे वरिष्ठ सहाय्यक कैलास तांगडे यांची जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागात कनिष्ठ सहाय्यक प्रशासन अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे त्यांच्या या नियुक्ती बद्दल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) किशोर काळे यांनी त्यांचे स्वागत केले.तांगडे बापू यांची बीड जिल्हा परिषदेत २५ वर्षे सेवा झाली आहे. यापूर्वी त्यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग, सामान्य प्रशासन विभाग, पंचायत विभाग आणि पंचायत समिती, पाटोदा येथे उल्लेखनीय काम केले आहे. अनुभवी, अभ्यासू, कार्यतत्पर आणि प्रामाणिक कर्मचारी म्हणून त्यांना ओळखले जाते. यांच्या पदोन्नतीमुळे अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## मुला-मुलींचा देव म्हणजे त्यांचे आईबाप-डॉ.वसंत हंकारे

जालना । प्रतिनिधी

आई-वडील आपल्या मुलांना आणि मुलींना सांभाळतांना रक्ताचं पाणी करता, हाडाची काडं करुन लेकरांना यशस्वी करण्याची स्वप्न पाहतात. परंतु, काही मुलं-मुली या आई-बापाच्या कष्टाचा विचार न करता त्यांच्या स्वप्नांना चुराडा करुन स्वतःच्या आयुष्याची बरबादी करुन घेतात. अशा वेळी देव सुध्दा तुमची साथ सोडतो, कारण, मुला-मुलींचे देव म्हणजेच आई-बाप असतात, अशा देवाला दुःखी करुन तुम्ही कुठे सुखी होणार आहात? त्यामुळे आई-बापाला कधीच दुखवू नका असा संदेश प्रसिध्द व्याख्याते वसंत हंकारे यांनी मुला-मुलींना दिलाय. मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी जैन मराठी शाळेत खा. डॉ. कल्याणराव काळे यांच्या संकल्पनेतून स्व. वैजिनाथराव काळे स्मृती प्रतिष्ठान च्या वतीने श्री वसंत हंकारे सरांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. वसंत हंकारे बोलत असतांना उपस्थित मुलींच्या भावना अनावर झाल्या, आणि मुली ढसा-ढसा रडू लागल्या.

या कार्यक्रमाला माजी आमदार अरविंदराव चव्हाण, स्व. वैजिनाथराव काळे स्मृती प्रतिष्ठाण चे सचिव श्री भाऊसाहेब बापू काळे, माजी सभापती भाऊसाहेब घुगे, जयप्रकाश चव्हाण, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष कृष्णा पाटील पडुळ, नंदा पवार, गणेश चांदोडे, नारायण वाढेकर, माजी उप सभापती सोपान तिरुखे, संस्थेचे अध्यक्ष सुदेशकुमार सकलेचा, सहसचिव कचरुलाल कुंकुलोळ, शाळेचे अध्यक्ष भायाणी, मुख्यध्यापक वानगोता, माजी मुख्यध्यापक कुंकुलोळ, राजेश खडके, अक्षय पवार यांची उपस्थिती होती. आपल्या आई-बापाला शेवटच्या श्वासापर्यंत जीव लावा, त्यांच्या प्रत्येक श्वासावर प्रेम करा, कारण आई-बापाचा श्वास निघून गेला, तर भिंतीवरच्या फोटोतील आई-बाप तुम्हाला कधीच जीव लावायला परत येणार नाही. याची जाणीव ठेवा असे आवाहन वसंत हंकारे यांनी केले. खा. डॉ. कल्याण काळे यांच्या संकल्पनेतून वसंत हंकारे यांचे जैन मराठी शाळेत न समजलेले आई बाप.. समजून घेताना या विषयावर आयोजित करण्यात आले होते. यावेळी शेकाडो विद्यार्थी आणि विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. वसंत हंकारे यांचे व्याख्यान सुरु असतांना प्रत्येकाच्या काळजाचा ठोका चुकत होता, हंकारे यांनी मुलींच्या डोळ्यासमोर आई-बापाचे कष्ट आणि लेकरावर जीव ओतनारा बाप उभा केला होता. त्यामुळे मुली देखील भाऊक झाल्या, त्यांच्या डोळ्यात अश्रु तरळून आले. मुला-मुलींच्या आयुष्यात प्रलोभने दाखविणारे भरपुर येतील, परंतु, त्या प्रलोभनांना बळी पडू नका, त्यांच्यामागे जावू नका, आई-बापाचे स्वप्न हे लेकरं मोठ्या पदावर गेल्यावरच पुर्ण होतात, त्यामुळे त्यांचा विश्वास कधीच तुटू देऊ नका असे आवाहन हंकारे यांनी केले. आपल्या आई-बापाला समजून घेण्याची वेळ आली आहे. आपल्या एखाद्या कृत्याने आई-बापाची मान खाली जाईल असे कृत्य आपल्या हातून घडणार नाही, याची काळजी घेण्याचे सांगत त्यांना लाचार करू नका, त्यांचे नाव उज्वल करण्यासाठी चांगले संस्कार मनाशी बाळगा. भविष्यात डॉक्टर, इंजिनिअर, वकील झालात आणि लाखो रुपये कमवून ठेवले, मात्र ते पाहण्यासाठी जर आई-बाप नसतील तर तुम्हाला त्या कमावलेल्या पैशांचा उपयोग काय? हा प्रश्न त्यांनी विद्यार्थ्यां समोर मांडला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती सोमानी यांनी केले.

# बीडचा राजा साकारणार रामेश्वरमच्या रामनाथस्वामी मंदिराची भव्य प्रतिकृती

### भाविकांना मिळणार मंदिराच्या इतिहासाची आणि कलात्मकतेची अनुभूती

बीड। प्रतिनिधी

नवसाला पावणारा बीडचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या न्यू गणेश मित्र मंडळातर्फे यंदा गणेशोत्सवात रामेश्वरम येथील रामनाथस्वामी मंदिराची भव्य प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. मंडळाच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्त विठ्ठल मंदिर चौकात १२० फूट लांब, ४८ फूट रुंद आणि ४८ फूट उंच असा भव्य देखावा उभारला जाणार आहे. विशेष म्हणजे, भाविकांना या प्रतिकृती मंदिराच्या आत जाऊन महादेव दर्शन घेता येणार आहे. या भव्य प्रतिकृतीचे भूमिपूजन नुकतेच अंगारकी चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजा करून करण्यात आले. महाराष्ट्रातील प्रसिद्ध पुरोहित कैलास महाराज रामदासी यांनी या भूमीपूजन सोहळ्याचे पौरोहित्य केले. न्यू गणेश मित्र मंडळाचे मुख्य मार्गदर्शक सीए गिरीशजी गिल्डा यांनी सांगितले की, दरवर्षी मंडळाच्या देखाव्याला भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे यंदा रामेश्वरममधील रामनाथस्वामी मंदिराची प्रतिकृती उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रामनाथस्वामी मंदिर हे भगवान शंकराचे भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक महत्वाचे मंदिर आहे तसेच हिंदू संस्कृती प्रमाणे चार धाम पैकी एक पावन धाम आहे . हे मंदिर भारतातील तामिळनाडू राज्याच्या रामनाथपुरम जिल्ह्यात आहे. या मंदिराला भारतीय संस्कृतीत विशेष महत्त्व आहे. हे मंदिर हिंदू धर्मातील चार धामांपैकी एक मानले जाते, ज्यामुळे या मंदिराचे महत्त्व आणखी वाढते.



रामनाथस्वामी मंदिराचा इतिहास रामायणाशी जोडलेला आहे. कथेनुसार, भगवान रामाने लंकेला जाण्यापूर्वी येथे शिवलिंगाची स्थापना करून पूजा केली होती. रामेश्वरम हे भारतातील सर्वात महत्वाचे तीर्थक्षेत्र मानले जाते. या मंदिराला भेट दिल्याने भक्तांना मोक्ष प्राप्त होतो, अशी मान्यता आहे. या मंदिरातील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे विशाल आणि कलात्मक बांधकाम. मंदिराच्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील गोपुरे अतिशय उंच आहेत, जे दूरवरूनही दिसतात. मंदिराच्या आवारात अनेक मंडप आहेत, ज्यात भाविक विश्राम करतात आणि धार्मिक विधी करतात. या मंदिरातील खांब, त्यावर केलेले कोरीव काम, आणि मंदिराच्या भिंतींवरील चित्रे भाविकांचे लक्ष वेधून घेतात. या मंदिराच्या प्रतिकृतीत मंदिराच्या वास्तुकलेचा, इतिहासाचा आणि धार्मिकतेचा अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यास माजी उपनगराध्यक्ष अमृत काका सारडा, नगरसेवक शुभमजी धूत, नगरसेवक राणा चव्हाण, नगरसेवक सम्राट दादा चव्हाण, दिनेशशेठ मुंदडा , अभिषेकजी चरखा, पवनसेठ राजपूत, भगीरथजी चरखा, भगीरथ मुंदडा, दिलीपशेठ गिल्डा, जयमल्हार बागल, माई पवार, गिरीश करावा, बाळू घेवारे, मंडळाचे अध्यक्ष विशाल शर्मा, उपाध्यक्ष अजय शहाणे, सचिव अमोल गवळी, सहसचिव सचिन मोरे, कोषाध्यक्ष गौरव शर्मा, प्रमुख विश्वस्त बबलू गिल्डा, नरेश मुंदडा, श्रीरामजी शर्मा, संजय गिल्डा, प्रगेश कुलकर्णी, कृष्ण मुंदडा, गोविंद शर्मा, ऋषिकेश करवा , संदीपसेठ कासट, फामजी पारीख, पुष्कर मुंदडा, अभिजीत दोडे, निशांत लड्डा, राम पारीख, शाम पारीख, कल्पेश मुंदडा, रवी बागल, श्रेयस गिल्डा युवा वानोरे , कोरे, संतोष मोरे, प्रणव सोनी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

न्यू गणेश मित्र मंडळ केवळ गणेशोत्सवच नव्हे, तर वर्षभर विविध सामाजिक आणि धार्मिक उपक्रमांचे आयोजन करते. यामध्ये जेष्ठ नागरिकांसाठी तीर्थयात्रा, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण यांसारख्या उपक्रमांचा समावेश असतो. यावर्षीच्या गणेशोत्सवात रामेश्वरम मंदिराच्या प्रतिकृतीने भाविकांना एक धार्मिक आणि सांस्कृतिक अनुभव मिळेल, असा विश्वास सीए गिरीशजी गिल्डा यांनी व्यक्त केला. स्थानिक कलाकार आणि मंडळाचे स्वयंसेवक यासाठी अथक परिश्रम घेत आहेत. यापूर्वी मंडळाने वैष्णवदेवी, अमरनाथ, केदारनाथ धाम, तिरुपती बालाजी मंदिराच्या भव्य दिव्य अशा प्रतिकृती साकारल्या होत्या, ज्यांना भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. बीडचा राजा च्या या नवीन उपक्रमाबद्दल शहरवासियांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे.

## जय भवानी महाविद्यालयात भितीपत्रकाचे विमोचन




पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयात हर घर तिरंगा अंतर्गत १३ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून झुंजार नेता चे तालुका प्रतिनिधी माननीय विजय जाधव प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर विश्वासराव कदम महाविद्यालयाचे सन्माननीय प्रभारी प्राचार्य सोमनाथ घाडगे सर सांस्कृतिक विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक रामकृष्ण प्रधान प्रमुख सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर प्रमुख पाहुणे विजय जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉक्टर विश्वास कदम अध्यक्ष प्राचार्य सोमनाथ घाडगे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉक्टर लोखंडे बी बी यांनी केले तर सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक शिवाजीराव काकडे सर आभार समाजशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ सुनीलराव जाधव या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते स्वातंत्र्य दिनाचे अवचित्य साधून मूलभूत अधिकार या विषयावर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने भीतीपत्रकाचे विमोचन केले या भितीपत्रकाचे संपादक प्राध्यापक नारायण फुने सर प्राध्यापक चव्हाण प्राध्यापक गोपाळ धांडे डॉक्टर प्रवीण शिलेदार व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले

# गणेशोत्सवात डीजेला परवानगी नाही म्हणजे नाहीच!

## नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाईचा शांतता बैठकीत पोलिसांचा इशारा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**न्यायालय व महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार यावर्षी गणेशोत्सवात शंभर टक्के डीजे बंदी राहणार असून, याबाबत कोणालाही सूट देणार नाही. बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. मिरवणुकांदरम्यान कोणत्याही प्रकारची हुल्लडबाजी किंवा गोंधळ सहन केला जाणार नाही. सर्व गणेश मंडळांनी शिस्त पाळून उत्सव साजरा करावा, अन्यथा पोलिसांना कठोर भूमिका घ्यावी लागेल असा स्पष्ट इशारा सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी दिला आहे. अंबाजोगाई शहरात गणेशोत्सव शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावा यासाठी अंबाजोगाई पोलिसांच्या वतीने नगर परिषदेच्या**



**विलासराव देशमुख सभागृहात आयोजित केलेल्या शांतता बैठकीत ते बोलत होते.**

शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक शरद जोगदंड यांच्या पुढाकाराने झालेल्या या बैठकीत कायदा-सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण, वीजपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, विसर्जन मार्ग, ध्वनीप्रदूषण नियंत्रण यांसह अनेक विषयांवर चर्चा झाली. याप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी कायद्याचे पालन करण्याचे व पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या की, विसर्जन मिरवणुका वेळेत पूर्ण व्हाव्यात यासाठी त्या लवकर सुरू करणे आवश्यक आहे. सर्व विभागांनी विसर्जन मार्गाचा पूर्व सर्व्हे करून अडथळे दूर करावेत, वाहतूक व सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ती पावले उचलावीत. अंबाजोगाईने आजवर शांततेत गणेशोत्सव साजरा केल्याचे त्यांनी नमूद करत, गणेश मंडळांनी सामाजिक सलोखा जपणारे, सामाजिक संदेश देणारे व जनजागृती करणारे देखावे तयार करावेत, असे आवाहन केले.तहसीलदार विलास तरंगे यांनी यावर्षी गणेश मूर्तीची उंची मर्यादित ठेवावी, यासाठी मंडळांनी पुढाकार घ्यावा असे सांगितले. शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या गणेशोत्सव स्पर्धांची माहिती देत त्यांनी, गणेश मंडळांची वाढलेली संख्या लक्षात घेऊन विसर्जनाचा कालावधी कमी करण्यासाठी योग्य नियोजन करण्यात येईल, असे आश्वासन दिले. महावितरणचे उपअभियंता कानडे यांनी वीजपुरवठ्याबाबत योग्य ती काळजी घेतली जाईल असे सांगितले. विजेच्या लोंबकळणाऱ्या तारा, मिरवणुकांसाठी अपुरा वेळ आणि अपुरा पोलीस बंदोबस्त या समस्या अनेक गणेश मंडळ प्रमुखांनी बैठकीत मांडल्या. यावर संबंधित विभागांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीस नायब तहसीलदार देशपांडे, नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक इफ्तिकार शेख, स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे, तसेच शहरातील सर्व गणेश मंडळ प्रमुख, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. पोलिस प्रशासनाने सर्व मंडळांना सहकार्याची ग्वाही देत, नियमांचे पालन करून उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले.

### नागरीकातून स्वागत

**दरम्यान, पोलिसांनी डीजे बंदीची कडक अंमल बजावणी करण्याची भूमिका घेतल्याबद्दल नागरीकातून स्वागत होत आहे. डीजेच्या गोंगाटामुळे गणेशोत्सवाच्या मूळ संकल्पनेला तिलांजली देण्यात येत होती अशी प्रतिक्रिया सर्वसामान्य नागरिकांनी व्यक्त केली. तर, डीजे बुकिंगला आगाऊ रक्कम दिलेली असल्यामुळे कमी आवाजात डीजेची परवानगी देण्याची मागणी काही मंडळांनी केली. तसेच, या बंदीमुळे डीजे व्यवसायावर अवलंबून असलेल्यांचे मोठे नुकसान होणार असल्याने ते देशोधडीला लागतील अशी खंत काही व्यावसायिकांनी बोलून दाखवली.**

## जालन्यात प्रतिबंधीत गुटखा पकडला ३ लाख ५९ हजाराचा मुद्देमाल जप्त

जालना । प्रतिनिधी

पोलिसांनी १२ ऑगस्ट रोजी मंगळबाजार येथे एक इसम नजीर छोटेमिया पठाण रा. मंगळबाजार हा त्याचे घरासमोर टू व्हीलर २१७१०८ यावर एका थैलीमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा विक्री करतांना मिळुन आला त्यास ताब्यात घेऊन त्यास विश्वासात घेऊन विचारपुस केली असता त्याने प्रतिबंधीत असलेला गूटखा व पानमसाला हा त्याचा भाऊ नसीर खॉन छोटेमिया खॉन रां मंगळबाजार जालना याचे सांगणे वरून विक्री करीत असून गुटख्याचा साठा हा त्यांचेच घरात ठेवले असल्याचे सांगितले वरुन दोन पंचासमक्ष त्याचे राहते घराचे वरील खोलीमध्ये आम्ही पोस्टे स्टापसह सदर ठिकाणी पंचासह छापा मारला असता सदर ठिकाणी पांढ-या रंगाच्या ०४ गोण्या मध्ये गोवा १००० गुटखा असे लेबल असलेले एकूण २६० पाकिट व खाकी रंगाचे ०४ कार्टून मध्ये पान मसाला चे एकूण २४० पाकीट व एका पाढ-या गोणीमध्ये चे १०८ पॉकेट असा एकूण २,०९,१४० रूपयाचा गुटखा व एक २१७१०८ दुचाको जिची किमत १,५०,०००/- असा एकूण ३,५९,१४० रूपयाचा मुददेमाल मिळुन आल्याने तो जप्त करून सदरील व्यक्तीविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बन्सल , मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. आयूष नोपाणी उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक श्री संदीप भारती यांचे नेतृत्वात डी.बी. पथका पोलिसांनी कारवाई केली.

## रक्षाबंधनाला आलेल्या भावाचा विद्युत तारेला चिटकून दुर्दैवी मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी

गावी आलेल्या ट्रक चालक तरुणाचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना आष्टी तालुक्यातील नागतळा येथे रविवारी घडली. गोविंद ज्ञानदेव वनवे, वय २३, रा. नागतळा, ता. आष्टी असे मयत तरुणाचे नाव आहे.



आष्टी तालुक्यातील नागतळा येथील गोंविद ज्ञानदेव वनवे, वय २३ हा ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करतो. शनिवारी रक्षाबंधन व तिसऱ्या श्रावण सोमवार गावातील नागनाथ देवस्थानाची मोठी यात्रा असल्याने तो रक्षाबंधनाच्या दिवशी गावी आला होता. रविवारी रात्री आठच्या सुमारास शेतातील वीजेच्या खांबा विद्युत प्रवाह उतरल्याने लागत नसल्याने तो विद्युत तारेवरील केबल हालवत असताना याच दरम्यान त्याला विजेचा शॉक लागून त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. पोलिसांनी त्याचा मृतदेह ताब्यात घेऊन आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आल्यांनतर शवविच्छेदन झाले. त्यांनतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात दिला. सोमवारी सकाळी शोकाकूल वातावरणात तरुणावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान तरुणाच्या पश्चात आई, वडील,

## सत्यशोधक पुरस्काराने सोनटक्के सन्मानित होणार

बीड । प्रतिनिधी

**सत्यशोधक ओबीसी परिषदेचे धारूर तालुका अध्यक्ष मा. बाळासाहेब सोनटक्के यांना सत्यशोधक प्रतिष्ठान मानाचा प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे .**



सत्यशोधक डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या नामांकित व्यक्तींना हा सन्मान प्रदान करण्यात येतो दि.१७/८/२०२५ रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात हा पुरस्कार वितरण सोहळा ठीक ११.. संपन्न होत आहे. सत्यशोधक ओबीसी परिषदेच्या माध्यमातून बाळासाहेब सोनटक्के यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून सामाजिक एकोपा जपला असून येथील दलित बहुजनांना फुले शाहू आंबेडकर यांचे विचार वाडी वस्ती तांड्यावर पोहचले पाहिजे अशा विविध क्षेत्रात काम करत आहे.रक्तदान शिबिर ,विविध गुणदर्शन स्पर्धा, वंचित उपेक्षित समाजाला न्याय देण्यासाठी शासन प्रशासनासोबत सतत पुढाकार घेत आहेत युवकां मध्ये सामाजिक परिवर्तनवादी विचार रुजवण्यासाठी शिव शाहू फुले आंबेडकर अण्णाभाऊ यांचे विचार व कार्य या संबंधाने सतत युवका मध्ये सक्रिय असतात याची दखल घेऊन सत्यशोधक प्रतिष्ठान तथा महाराष्ट्र अंधार सेना आरंभ चे अध्यक्ष दिपक थोरात यांनी हा पुरस्कार घोषित केला आहे हा पुरस्कार मान्यंवराच्या हस्ते देऊन बाळासाहेब सोनटक्के चा गौरव करण्यात येणार असून या कार्यक्रमास आपण सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन सत्यशोधक प्रतिष्ठान व महाराष्ट्र आधार सेना यांनी केले.

## सादोळा येथील लोणी-सावंगी उपसा जलसिंचन योजना तेरा वर्षांपासून अर्धवट अवस्थेत



### १५ ऑगस्टला पालकमंत्री अजित पवार यांची गाडी अडवून निवेदन देणार : भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सादोळा येथील लोणी-सावंगी गोदावरी पात्रातून २०१२ मध्ये सुरू झालेली उपसा जलसिंचन योजना आजही अवर्धट अवस्थेतच आहे. तेरा वर्षांच्या प्रतीक्षेनंतरही एकही थेंब पाणी माजलगाव धरणापर्यंत पोहोचले नाही.हे काम वेळेत पूर्ण झाले असते,तर आज माजलगाव धरणात गोदावरीचे पाणी झऱ्यासारखे आले असते.या प्रकरणी १५ ऑगस्टला पालकमंत्री अजित पवार यांची गाडी अडवून निवेदन देणार असल्याचे शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी सांगितले.

भाई थावरे म्हणाले की,सध्याच्या घडीला माजलगाव धरणातील पाणीसाठा चिंताजनकरीत्या कमी झाला आहे.परंतु लोणी-सावंगी उपसा जलसिंचन योजना पूर्ण झाली असती तर गोदावरी नदीचे पाणी माजलगाव धरणात सोडता आले असते आणी ◀◀ पान ३ वर

## शहरातील विविध विषयांवर आ.संदीप क्षीरसागरांनी घेतला नगर परिषदेत आढावा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नागरिकांसाठी महत्वाच्या असलेल्या विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१३) रोजी आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहारातील नागरी प्रश्नांवर सविस्तर आढावा घेऊन महत्वाचे असलेले विविध प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ.क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासनाला केल्या.



**महत्वाचे विषय तातडीने मार्गी लावण्याच्या दिल्या सूचना**

बीड शहरातील अनेक नागरी प्रश्न प्रलंबित आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर सातत्याने शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. या अनुषंगाने बीड नगरपरिषदेच्या स्तरावरील विविध प्रलंबित विषयांवर आढावा घेण्यासाठी बीड नगरपरिषदेचे नवीन मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि प्रशासनातील अधिकारी यांच्यासमवेत आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठक घेऊन, सविस्तर चर्चा करून आढावा घेतला. तसेच बीड शहरातील नागरिकांसाठी महत्वाचे असलेले विविध प्रश्न प्रशासकीय स्तरावरून तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासनाला केल्या आहेत. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, बीड नगरपरिषदेतील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## संत सेवालाल महाराज बंजारा/ लबाणा तांडा समृद्धी योजनेच्या प्रमुखपदी अँड.पंडितभाऊ राठोड

बीड । प्रतिनिधी

संत सेवालाल महाराज ला मान तांडा समृद्धी योजनेच्या मराठवाडा प्रमुख पदी एडवोकेट पंडित राठोड यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नियुक्ती केली आहे त्यांच्या या नियुक्ती बद्दल प्रा पी टी चव्हाण यांच्यासह मराठवाड्यातील भाजप पदाधिकारी भटके विमुक्त आघाडी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले आहे.



महाराष्ट्र राज्यात दिड कोटी पेक्षा जास्त संख्येने असलेल्या बंजारा समाजाला सामाजिक न्याय मिळाला पाहिजे व जोड सात हजार पेक्षा जास्त संख्येने असलेल्या तांडयावर रस्ता,नाली,पिण्याचे शुद्ध पाणी,सांस्कृतिक सभागृह, तांडा अंतर्गत सिमेंट रस्ता, विद्युत पुरवठा,आरोग्य उपकेंद्र इत्यादी मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भाजपा व महायुती सरकारने संत सेवालाल महाराज बंजारा/ लबाणा तांडा समृद्धी योजना सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. बंजारा समाजाच्या या महत्वकांक्षी योजनेच्या मराठवाडा विभाग प्रमुखपदी अँड.पंडितभाऊ राठोड यांची महायुती सरकारने नियुक्ती केली आहे.बंजारा समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणारे युवा नेते तसेच लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब,महसूलमंत्री ◀◀ पान ३ वर

## आजच्या तिरंगा रॅलीत बहुसंख्येने उपस्थित रहा - अशोक रसाळ

बीड । प्रतिनिधी

देशभरात स्वतंत्र उत्सव उत्साहात साजरा करण्याकरता उत्साह वाढत असताना बीड येथील देशभक्त प्रेमी यांनी तिरंगा रॅलीच्या आयोजन बीड शहरात केले आहे या रॅलीची सुरुवात १४ ऑगस्ट रोजी सकाळी ९:३० मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून पुढे सुभाष रोड, अण्णा भाऊ साठे चौक ते,छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समारोप होणार आहे, देशभक्तीपर गीतांनी जयघोषाने व विविध कार्यक्रमांनी या रॅलीच्या



माध्यमातून आपले देश प्रेम व्यक्त करण्यासाठी सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने ठीक नऊ वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा या ठिकाणी उपस्थित रहावे असे आवाहन देश प्रेमी सहित अशोक रसाळ यांनी केले आहे

## संभाजी ब्रिगेडच्या बीड जिल्हाध्यक्षपदी प्रा.शशिकांत कन्हेरे यांची निवड

आष्टी। प्रतिनिधी

संभाजी ब्रिगेडच्या बीड जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते संभाजी ब्रिगेडची मुलूख मैदानी तोफ प्रा शशिकांत कन्हेरे यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष ॲड मनोज आखरे व महासचिव सौरभ खेडेकर, प्रदेश प्रवक्ते गंगाधर बनबरे व सर्व प्रदेश कार्यकारिणीच्या उपस्थितीत त्यांना नियुक्ती पत्र पुणे येथील पंडीत जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृहात जिल्हा अध्यक्ष पदगृहन सोहळ्याच्या कार्यक्रमात फेड



निवड करण्यात आली आहे. सामाजिक कार्यात सतत अग्रेसर राहणा-या प्रा कन्हेरे यांची पुन्हा बीड जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड झाल्याने बीड जिल्हयात आनंद व्यक्त केला जात आहे.

मराठवाडासह बीड जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडचा विचार सर्वदूर पोहोचविला असे.प्रा शशिकांत कन्हेरे यांनी सामाजिक बांधिलकी मानून केलेले कार्य तसेच ते अनेक ◀◀ पान ३ वर

## विश्व हिंदू परिषद स्थापना दिन व जीवनगौरव पुरस्कार वितरण समारंभ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

विश्व हिंदु परिषद, अंबाजोगाई प्रखंड व बजरंग दल अंबाजोगाईच्या वतीने धर्मवीर विश्व हिंदू परिषद स्थापना दिन व जीवनगौरव पुरस्कार वितरण समारंभ रविवार दि.१७ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजता गोपीनाथराव मुंडे सभागृह,खोलेश्वर महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आला असून आपल्या प्राणांची पर्वा न करता केलेल्या अतुलनीय हिंदूधर्म रक्षण व कार्याबद्दल प्रफुल्ल (नाना) कुलकर्णी यांना धर्मवीर जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.शरदराव हेबाळकर (पूर्व अध्यक्ष, अखिल भारतीय इतिहास संकलन समिती,रा.स्व.संघ) हे राहणार आहेत.तर प्रमुख पाहुणे आ.नमिता मुंदडा,कृष्णाजी देशमुख (विहिंप.प्रान्त कार्य. सदस्य, बजरंगदल प्रान्त पालक)चंद्रकांत घोलप (संयोजक बजरंग दल प्रांत) ऍड.बाळकृष्ण तेरकर (जिल्हा मंत्री विहिंप)डॉ.मुकुंद कुलकर्णी (प्रांत सेवा प्रमुख, विहिंप)डॉ.गोपाळ चौसाळकर (जिल्हा उपाध्यक्ष विहिंप),साईनाथ उपरे (अध्यक्ष,निलेश डहाळे मंत्री) आदी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अशिष शिंदे,अक्षय सातपुते,संयोजक सुदर्शन महाराज साखरे संघटक मिलिंद जोगी विश्व हिंदु परिषद व बजरंग दल प्रखंड, अंबाजोगाई यांनी केले आहे.

## तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये गणेश उत्सव ईद ए मिलाद निमित्त शांतता समितीची बैठक

### उत्सवा दरम्यान गैरप्रकार झाल्यास कायदेशीर कारवाई : सपोनि निलंगेकर

तलवाडा । प्रतिनिधी

आगामी सणा निमित्ताने गणेश उत्सव व ईद ए मिलाद या निमित्ताने दर वर्षी प्रमाणे याही वर्षी तलवाडा पोलीस स्टेशन येथे दिं.१२ रोजी संध्याकाळी शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सपोनि मनोज निलंगेकर म्हणाले की दहा दिवस गणेशोत्सव आनंदाने साजरा करावा जेणेकरून गणेश उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या पासुन दुसऱ्यांना त्रास होईल असे वागु नये



गणेश उत्सवा दरम्यान सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यात यावे विविध सामाजिक देखावे सादर केले पाहिजे देखावे सादर करत असताना आसा कोणताही देखावा सादर करु नये जेने करुन दुसऱ्या समाजाला त्याचा त्रास होईल असे देखावे करू नये ईद ए मिलाद व गणेश उत्सव सण सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन एकजुटीने साजरे करायला पाहिजे गावांमध्ये व गावातील नागरिकांमध्ये भाई चार कायम राहीला पाहिजे ◀◀ पान ३ वर

## चौसाळा येथील हरिनाम सप्ताह महिलांचा उत्स्फूर्तपणे सहभाग



चौसाळा । प्रतिनिधी

येथील सुरू असलेल्या हनुमान मंदिरामध्ये हरिनाम सप्ताह मोठ्या भक्ती भावाने सुरू आहे या सप्ताहात गावातील भाविक महिला महिला ने ऊसुरपणे सहभाग घेतला आहे दररोज सदर भाविक महिला हनुमान मंदिरामध्ये पारायणामध्ये सहभागी झाले आहेत सदर सप्ताहामध्ये दररोज विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहात पारायण कीर्तन शिव महापुराण कथा ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आता खड्ड्यांची जबाबदारी अभियंत्यावर; महापालिकेकडून 'रोड मित्र' ॲपची सुविधा

**पुणे | प्रतिनिधी**

**आता शहरातील खड्ड्यांची जबाबदारी महापालिकेच्या पथ विभागातील अभियंत्यावर निश्चित केली जाणार आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांची तक्रार नागरिकांना थेट जागेवरून करता यावी, यासाठी महापालिकेकडून 'पीएमसी रोड मित्र' हे मोबाईल प तयार करण्यात आले आहे.**



या पद्वारे नागरिक रस्त्यावरील खड्ड्यांचे फोटो थेट महापालिका प्रशासनाला पाठवू शकतात. या पच्या माध्यमातून संबंधित ठिकाणाचे अक्षांश आणि रेखांश फोटोवर दिसणार असल्याने खड्ड्याचे नेमके स्थान प्रशासनाला कळणार आहे. तक्रार मिळाल्यानंतर ४८ तासांच्या आत खड्डा दुरुस्त करण्याची जबाबदारी संबंधित परिसरातील अभियंत्यावर राहणार आहे. खड्डा बुजवल्यानंतरचा फोटो तक्रारदाराला पवर पाहता येणार आहे. या पचे उद्घाटन महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते करण्यात आले.

शहरातील अनेक रस्त्यांवर पावसामुळे पाणी साचून खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी रस्त्यावर खडी पसरली असून, दुचाकीस्वारांना वाहन चालविताना अडचण येत आहे. खड्ड्यांमुळे अनेक अपघात होत असून, काहींना रुग्णालयात उपचार घ्यावे लागत आहेत, त्यातच ड्रेनेज व पाणी पुरवठ्याच्या जलवाहिन्या टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणात रस्ते खोदाई करण्यात आली होती.नंतर पॅचवर्क करण्यात आले, परंतु ते रस्त्याशी एकरूप न झाल्याने पुन्हा खड्डे पडत आहेत. वरवरच्या दुरुस्तीमुळे रस्ते उखडत असल्याने खड्ड्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर 'पीएमसी रोड मित्र' प सुरू करण्यात आले आहे.

पथ विभागप्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले की, या पवर नागरिक खड्ड्याच्या ठिकाणचे दोन-तीन फोटो तसेच व्हिडीओ अपलोड करू शकतात. पमध्ये लोकेशन दाखविली जाणार असल्याने तक्रार संबंधित क्षेत्रातील कनिष्ठ अभियंत्यांकडे आपोआप पोहोचेल.तक्रार मिळाल्यानंतर कनिष्ठ अभियंत्याने खड्डा बुजवून त्याचे फोटो पमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. त्यानंतर तक्रारदाराला पूर्वीची व नंतरची स्थिती पाहता येईल. त्यानंतरच तक्रार निकाली निघेल. हे प सध्या न्ड्रॉईड वर्जनमध्ये उपलब्ध असून, नागरिक प्ले स्टोअरवरून डाऊनलोड करू शकतात.पवरील तक्रारींची प्रगती पथ विभागप्रमुखांना डॅशबोर्डवर पाहता येणार आहे. त्यामुळे कोणत्या भागातील तक्रार सोडवली गेली, कोणत्या अधिकाऱ्याने निवारण केले किंवा केले नाही. याची माहिती दिसणार असल्याने संबंधित अभियंत्यावर तत्काळ कारवाई करणे शक्य होणार आहे.

# चुलतीला आय लव्ह यू म्हणाला; पुतण्याला राग अनावर झाला अन्...

पुणे | प्रतिनिधी

पुण्यातील चंदनगर भागातील आंबेडकर वसाहतीत आय लव्ह यू म्हणाल्याच्या रागातून एकाचा खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. १२ ऑगस्ट मंगळवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या धक्कादायक घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चुलतीला आय लव्ह यू म्हणाल्याचा रागातून हॉकी स्टिक आणि लाथा बुक्क्यांनी मारहाण करत खून करण्यात आला. साईनाथ उर्फ खलीबली दत्तात्रय जानराव (वय ३५) असं खून झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. तर सोन्या उर्फ आदित्य संतोष वाल्हेकर (वय २१) आणि समर्थ उर्फ पप्पू करण शर्मा (वय २२) अशी पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी आरोपींविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. मयत साईनाथ याला दारूचे व्यसन होते. अशी माहिती समोर आली आहे. तसेच पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये त्याला मारहाण झाल्याचे निष्पन्न झाले आहे. दरम्यान, चंदननगर परिसरात बेवारस मृतदेह असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

मृत साईनाथ याने आरोपी सोन्या उर्फ आदित्य संतोष वालेकर याच्या चुलतीची छेड काढली होती आणि तिला आय लव्ह यू असं देखील




म्हणाला होता. यामुळे राग अनावर झाल्याने आरोपींनी त्याला लाथा बुक्क्यांनी आणि हॉकी स्टिकने बेदम मारहाण केली होती. या मारहाणीत साईनाथ गंभीर झाला आणि त्याचा मृत्यू झाला.

**आरोपींनीच फोन करून दिली खबर**

पोलिस नियंत्रण कक्षाला एक व्यक्ती बेवारस पडल्याची माहिती आरोपी सोन्या उर्फ संतोष वाल्हेकर याने दिली. मात्र, पोलिसांच्या तपासा दरम्यान त्यानेच मित्राच्या मदतीने या व्यक्तीचा खून केल्याचे निष्पन्न झाले आहे.

# शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या आंदोलनाला यश: शासनाकडून मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाने विविध मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा करुन आश्वासन दिल्यामुळे शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी बेमुद सामूहिक रजा आंदोलन मंगळवारी (दि.१२) स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता शिक्षण विभागाचे ठप्प झालेले कामकाज बुधवार (दि.१३) पासून पुन्हा सुरु होण्याचा मार्गही खुला झाला आहे.

नागपूर विभागासह सर्व बोगस शालार्थ प्रकरणांची चौकशी शासन निर्णयाव्दारे गठित केलेल्या विशेष चौकशी समितीकडे वर्ग करावी, विना चौकशी कोणत्याही अधिकारी कर्मचारी यांना नियमबाह्य अटक करू नये, शालार्थ प्रकरणी निलंबित झालेले सर्व अधिकारी यांना सेवेत पुनर्स्थापित करण्यात यावेत, अतिरिक्त कामांचा ताण दूर करावा या मागण्यांसाठी अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाच्या वतीने ८ ऑगस्टपासून अधिकाऱ्यांनी बेमुदत सामूहिक रजा आंदोलन पुकारले होते.



संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांच्या सोबत मुंबई येथे मंगळवारी बैठक झाली. संघटनेचे अध्यक्ष शेषराव बडे, संचालक डॉ. महेश पालकर, शरद गोसावी, कृष्णकुमार पाटील, सहसंचालक राजेश क्षीरसागर, अनुराधा ओक, अनिल साबळे, उपसंचालक भाऊसाहेब चव्हाण, महेश चोथे, मीना शेंडकर, ज्योती परिहार, सरोज जगताप, रवींद्र वाणी व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

संघटनेच्या सर्व न्याय मागण्यांबाबत सकारात्मक विचार केला जाईल. संघटनेच्या मागण्यांचे निवेदन पोलीस विभागाला शासन स्तरावरून पाठविण्यात येणार आहे. कोणत्याही निरपराध अधिकारी कर्मचारी यांच्यावर चुकीची कारवाई होणार नाही अशा प्रकारचे आश्वासनही शिक्षण मंत्री, प्रधान सचिव यांच्याकडून देण्यात आले आहे. मात्र यापुढे विनाचौकशी नियमबाह्य पध्दतीने अटक झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता स्थगित केलेले आंदोलन पुन्हा सुरू केले जाईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

# पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेचा ५३ वा वर्धापन दिन व कर्ज योजना शुभारंभ उत्साहात संपन्न

**पुणे | प्रतिनिधी**

**पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेचा ५३ वा वर्धापन दिन समारंभ आणि सूक्ष्म, लघु व मध्यम कर्ज योजनेचा शुभारंभ कार्यक्रम बुधवारी, परमार डिस्पेन्सरी कॅम्प, पुणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. बँकेने यशस्वीपणे ५२ वर्षे पूर्ण करून ५३व्या वर्षात पदार्पण केले आहे.**




या प्रसंगी बँकेचे संस्थापक संचालक व विद्यमान अध्यक्ष कैलासराव (मामा) सखाराम कोद्रे, उपाध्यक्ष साहेबराव विठ्ठलराव लोणकर, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट अध्यक्षा स्मिता शैलेश लडकत, संचालक मंडळाचे सदस्य कैलास (भाऊ) रामचंद्र कोद्रे, मंगल शिवाजीराव टिळेकर, शांताराम कोंडिराम चौधरी, नंदकिशोर तुकाराम विडकर, देवेंद्र सुरेश भाट, ॲड. अविनाश केरवा कवडे, ॲड. दिलीप महादेव जगताप, संदीप (दादा) कैलासराव कोद्रे, अनिल जगन्नाथ आवनावे, ज्ञानेश्वर रामभाऊ मोझे, किशोर फत्तु संघेलिया, संतोष मधुकर पेठे, अमित अजित गिरमे, सल्लागार जीवन दत्तात्रय म्हेत्रे, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य के. सी. मिश्रा, अविनाश साहेबराव वनमाले, वी. वी. मोहंती, सेवक प्रतिनिधी बाळु पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण जवळकर, महाव्यवस्थापक अस्लम तांबोळी, सहाय्यक महाव्यवस्थापक सुनिल जमदाडे, सेवक वर्ग, दैनंदिन ठेव प्रतिनिधी आणि सभासद उपस्थित होते.

बँकेच्या अध्यक्षांनी आपल्या भाषणात सभासद आणि खातेदारांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी तसेच त्यांच्या व्यवसायवृद्धीसाठी संचालक मंडळ कटिबद्ध असल्याचे सांगितले. याच उद्देशाने बँकेने कमी व्याजदरात सुलभ सूक्ष्म, लघु व मध्यम कर्ज योजना सुरू केली आहे. या योजनेचे उद्घाटन अध्यक्ष कैलासराव कोद्रे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी खातेदार वागवान फरीन इशिकी, ओम अमोल साळवे, फुलाबाई कांबळे, समिर शेख आणि वागवान इशतिकी अब्दुल यांना कर्ज योजनेचे धनादेश प्रदान करण्यात आले. बँकेने सर्व सभासद आणि खातेदारांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# चिंबळीत 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत ध्वजारोहण; स्वातंत्र्याचा उत्साह

**चिंबळी | प्रतिनिधी**

**भारतीय स्वातंत्र्याच्या ७९ व्या वर्धापनदिनाच्या पार्श्वभूमीवर खेड तालुक्यातील चिंबळी (ता. खेड) येथे 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत ध्वजपूजन आणि ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. देशभक्तीची भावना जोपासण्यासाठी आणि स्वातंत्र्याचा अभिमान जपण्यासाठी शासनाच्या धोरणानुसार आयोजित या कार्यक्रमात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.**



चिंबळी ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ध्वजपूजन सरपंच ज्योतीताई जैद, ग्रामपंचायत सदस्या राजश्री जैद, ग्रामपंचायत अधिकारी तुषार सांळूखे यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजारोहण उपसरपंच राहुल चव्हाण यांनी करून राष्ट्रगीत आणि ध्वजगीत सादर करण्यात आले. यावेळी ध्वजाला अभिवादन करून सलामी देण्यात आली. कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याचवेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतही ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. ह.भ.प. जयवंत मानकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि संचालक उपस्थित होते. ह.भ.प. जयवंत मानकर यांनी सामाजिक बांधिलकी जपत शालेय विद्यार्थ्यांसाठी खाऊ वाटपासाठी २,००० रुपये रोख स्वरूपात दिले. तसेच, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी १५,००० रुपये वार्षिक पारितोषिक जाहीर केले. त्यांच्या या योगदानाबद्दल शाळेच्या वतीने शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. 'हर घर तिरंगा' अभियानाने गावात देशभक्तीचा उत्साह निर्माण झाला आहे.

# केतकी बहिरटचा बीज राखीद्वारे पर्यावरण संदेश

पिंपरी | प्रतिनिधी

अंगारकी चतुर्थी निमित्त शिवछत्रपती शिवाजी राजे माध्यमिक विद्यालयातील इयत्ता नववीची विद्यार्थिनी केतकी बहिरट हिने पर्यावरण संवर्धनाचा अभिनव संदेश देत सोळा प्रकारच्या बियांपासून तयार केलेली 'बीज राखी' गणरायाला अर्पण केली.



या राखीत मध्यभागी कापसाचे बोंड ठेवून त्याला सर्वोच्च स्थान दिले गेले. इतर बियांमध्ये सुपारी, कॉसमॉस, घोसाळ, कारलं, सातू, साली, मका, दुधी भोपळा, काशी भोपळा, गुंजा, करडई, लाल आंबाडी, लाल हादगा आणि टरबूज या बियांचा समावेश होता. ही राखी पेंटोनिक, कोगेटेड शीट व रंगीत लोकर यांच्या सहाय्याने आकर्षक पद्धतीने सजविण्यात आली. मागील वर्षीही केतकीने फुलांची राखी तयार करून वेगळा पर्यावरणपूरक संदेश दिला होता.


पर्यावरणपूरक उपक्रमाद्वारे धार्मिक सण साजरे करताना निसर्गाचे जतन करण्याचा आदर्श केतकीने घालून दिला आहे. शाळा व परिसरातील नागरिकांकडून तिच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# भाजप आमदार महेश लांडगे कडाडले! अजित पवारांना दिलं आव्हान?

## म्हणाले गोरक्षण करणे म्हणजे...

इंदापूर | प्रतिनिधी

इंदापूर येथे वीर सरदार मालोजीराजे भोसले यांची गढी आणि समाधी येथील अतिक्रमण हटवण्याबाबत सकल हिंदू समाजाच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी जनसमुदायाला संबोधित करताना भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं नाव न घेत शाब्दिक प्रहार केला आहे.





यामुळे आता गेल्या काही दिवसांपासून पुणे जिल्ह्यात अजित पवार विरुद्ध महेश लांडगे यांचा संघर्ष पाहायला मिळत आहे. त्यात आता आणखी एका नव्या मुद्याची भर पडली आहे. तीन दिवसांपूर्वी कुरेशी समाजातील प्रतिनिधींनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी 'गोरक्षकांना आवर घाला' अशा सूचना पोलीस प्रशासनाला केल्या होत्या. यामुळे हिंदुत्ववादी संस्था, संघटना आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजाची सूर दिसून येत आहे. याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या.

**गोरक्षण करणे म्हणजे**

यानंतर इंदापूर येथील आंदोलनात आमदार महेश लांडगे यांनी अजित पवार यांचं नाव न घेता अप्रत्यक्षपणे सुनावलं आहे. गोरक्षक धर्माचे रक्षण करीत आहे. गोमातेच्या संवर्धनासाठी काम करीत आहेत. गोरक्षकांवर खोटे केस करण्याचा प्रयत्न कुणी केला. तर आम्ही कदापि सहन करणार नाही. गोरक्षण करणे म्हणजे चिंचोका खेळणं नाही, अशा शब्दांत लांडगेंनी प्रहार केला आहे.

**बंदी घालण्याची भाषा कोणी करु नये**

एखादा जिहादी, कोणी कुरेशी जातो आणि सांगतो 'गोरक्षक आमचं नुकसान करतात'. त्यांना काय अडचण आहे? जुन्नरमधील बेकायदेशीर कत्तलखाने आम्ही बंद केले आहेत. गोमातेचे आम्ही रक्षण करणार आहोत. गोरक्षकांवर बंदी घालण्याची भाषा कोणी करु नये. गोरक्षण, लव्ह जिहाद, लॅन्ड जिहाद, धर्मांतर खपवून घेणार नाही. भाजपा महायुती हिंदूत्ववादी सरकार आहे. गोरक्षकांनी घाबरण्याचं कारण नाही.

# पुण्यात राष्ट्रवादी अजित पवार पक्षाला मोठा धक्का! मुळशी तालुक्यातील शेकडो पदाधिकारी भाजपात

हिंजवडी | प्रतिनिधी

दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचं बिगुल वाजणार आहे. त्याअगोदर पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात एक मोठा राजकिय भूकंप झाल्याने मुळशीच्या राजकारणाला एक कलाटणी मिळणार आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या अनेक आजी माजी पदाधिकाऱ्यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी ( दि. १३) मुंबई पक्षकार्यालयात शेकडो जणांनी पक्ष प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत या कार्यकर्त्यांनी कमळ हाती घेतलं आहे.



मोठ्या प्रमाणावर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील पदाधिकाऱ्यांनी प्रवेश केल्याने हा पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे.आगामी निवडणुकांच्या दृष्टीने सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चबांधणीला सुरुवात केली असून भाजपने देखील स्थानिक पातळीवर प्रत्येक तालुक्यात लक्ष केंद्रीत केले आहे.

प्रवेश केलेल्यांमध्ये राष्ट्रवादीचे मुळशी पंचायत समितीचे माजी सभापती पांडुरंग ओझरकर, माजी जिल्हा परिषद सदस्या स्वाती हुलावळे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अमित कंधारे, पीएमआरडीएचे सदस्य सुखदेव तापकीर, अजित पवार गटाचे भोर विधानसभा माजी अध्यक्ष सुरेश हुलावळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पांडुरंग राक्षे,अमृता हिंगडे यांचा समावेश आहे.

पक्ष प्रवेशावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार संग्राम थोपटे, प्रसाद लाड, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, कार्यालय सहसचिव भरत राऊत, तालुकाध्यक्ष हनुमंत चव्हाण, गंगाराम मातेरे, शिवाजीराव बुचडे, राजाभाऊ वाघ, तानाजी हुलावळे, विनायक ठोंबरे, दादाराम मांडेकर, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष संदीप साठे, वैशाली सणस ,राहुल शेडगे,रमेश सणस, दत्तात्रय गाढवे, सविता गवारे , जीवन साखरे, शरद जांभूळकर , विशाल साखरे, युवराज पायगुडे, आदी उपस्थित होते.

ज्या कार्यकर्त्यांनी विश्वासाने पक्षप्रवेश केला त्या विश्वासास पात्र ठरण्याचा प्रयत्न आम्ही करू, अशी ग्वाही भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यावेळी दिली. तर माजी आमदार संग्राम थोपटे म्हणाले राज्य प्रगतीपथवावर नेण्यासाठी स्थानिक पातळीवर मोठा जनसंपर्क असलेले हे कार्यकर्ते असल्याने नव्या जुन्याचा मेळ घालून भारतीय जनता पक्ष वाटचाल करील. या पक्ष प्रवेशासाठी भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष संदीप साठे यांनी विशेष प्रयत्न केले.

# माध्यमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी संजय हुलावळे

पवनानगर : नूतन महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक व सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अध्यापक संजय हुलावळे, उपाध्यक्षपदी संतोष घरदाळे आणि खजिनदारपदी संगिता खराडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



पतसंस्थेचे माजी अध्यक्ष समीर गाडे यांनी ठरलेल्या कालावधीत पदाचा राजीनामा दिल्याने अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी निवडणुकीची प्रक्रिया राबवण्यात आली होती. पतसंस्थेच्या कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी राकेश निखारे यांच्या उपस्थितीत ही निवड पार पडली.

पतसंस्थेचे कार्यकारी संचालक (सीईओ) म्हणून भाऊसाहेब आगळमे कामकाज पाहत आहेत. निवडीच्या वेळी माजी अध्यक्ष समीर गाडे, संचालक सोमनाथ साळुंके, विनोद भोसले, अलका आडकर, भारत काळे, संजय कसाबी, रूपेश शिंदे, दत्तात्रय ठाकर, रोहित ढोरे, गणेश साबळे, वंदना मराठे आदी मान्यवर उपस्थित होते. निवडीनंतर नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ अध्यक्ष बाळा भेगडे, सचिव संतोष खांडगे, तसेच एकविरा विद्या मंदिर शालेय समिती अध्यक्ष सोनबा गोपाळ यांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.